नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १३२ * * अमरावती * शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कार खड्डयात कोसळुन ५ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, रतलाम, दि. १४ :

रतलाममध्ये एका कारचे नियंत्रण सुटले आणि ती खड्ड्यात पडली. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, ज्यात एका १५ वर्षीय मुलाचा आणि एका ६० वर्षीय वृद्धाचा समावेश आहे. रतलाम जिल्ह्यातील रतलाम पोलिस स्टेशन हद्दीतील भीमपुरा गावाजवळ, माही नदी पुलाच्या अगदी आधी हा अपघात झाला. सकाळी ७:३० च्या सुमारास, नोंदणी क्रमांक MH०३ EL १३८८ असलेली कार रेलिंग तोडून दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेवर पडली. प्राथमिक माहितीनुसार, कारमध्ये मुंबई आणि अहमदाबाद येथील लोक होते. ते दिल्लीहून मुंबईला जात होते. सर्व मृतदेह रतलाम मेडिकल कॉलेजमध्ये पाठवण्यात आले आहेत.

# बिहारमध्ये एनडीएची सरशी

अग्राग्रलेख

खरीखरी..

## विजयाला नमस्कार !

बिहारमध्ये आज सर्वांचेच अंदाज चुकले. जे जिंकले त्यांना हे पचवणे जड झालेले आहे की, आपण जिंकलो आणि हरले त्यांना जिरवणे भारी झालेले आहे की आपण हरलो. बिहारच्या या विधानसभा निवडणूकीने खरोखरच इतिहास घडवला आहे. यात निवडणूक आयोगाची भूमिका किती मोठी आहे किंवा त्यांनी काय काय केले यावर आता कितीही आरोप किंवा आक्षेप घेतले. तरी आम्ही काल वर्तवल्याप्रमाणे, जो जीता वही सिकंदर होता है. त्यामुळेच या निकाला विरुद्ध हरलेल्या पक्षाला नक्कीच आश्चर्य वाटले असेल कारण या पक्षातील काही वाचाळ वीरांनी आपण हरलो तर बिहारमध्ये नेपाळ सारखे होईल अशा वल्गना केल्या होत्या. पण बिहार म्हणजे नेपाळ नाही कारण नेपाळ हे एक राष्ट्र आहे आणि बिहार देशाचा फक्त एक प्रांत आहे. बिहारच्या महिला मतदारांनी मोदी आणि नितीश यांच्या नावावर जबरदस्त मतदान केले असल्याचे दिसून येत आहे. माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी तर एका शब्दात जे सांगायचे ते आता सांगून टाकले आहे. बिहार सारख्या राज्यामध्ये महिलांच्या खात्यात १०,००० रुपयांची रक्कम येणे ही फार मोठी गोष्ट आहे, असे त्यांचे म्हणणे होते. तात्पर्य बिहार अतिशय गरीब राज्य आहे हे सिद्ध झाले. मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आता बिहार या तीन राज्यांचा धडा पूर्ण देशभर राबवला गेला तर सत्तारूढ पक्षाची उंची इतकी मोठी होईल की तिथपर्यंत विरोधी पक्षांना पोहोचताही येणार नाही. मोदी आणि शहा यांना बिहारची निवडणूक जिंकणे अतिशय आवश्यक होते. ही बिहारची निवडणूक जिंकली नसती तर त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असते. परंतु तेजस्वी यांचे तेज कमी पडले कारण अखेरपर्यंत मुख्यमंत्री पदासाठी तेजस्वी यांच्या नावाची घोषणा झाली नव्हती. त्यामुळेच तोपर्यंत तेजस्वी यांच्या प्रचाराला वेग आला नव्हता. त्यातच राहुल गांधींनी नेहमीप्रमाणे प्रचार केलाच नाही. आता निवडणुकीच्या निकालानंतर मोदी आणि शाह यांचे आसन अजून बळकट झालेले आहे. चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांना एनडीएत राहणे भाग आहे. मग आता प्रश्न असा आहे की, बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या नावाने मते मिळाली असली तरी मुख्यमंत्री पदावर भारतीय जनता पक्षालाही आपला दावा करता येऊ शकतो का. याचे उत्तर असे आहे की भारतीय जनता पक्षाने जास्त जागा जिंकल्यामुळे तो त्यांचा अधिकार होऊ शकतो. भाजप जवळ संपूर्ण बिहारमान्य नेता नाही हे खरे असले तरी, वरिष्ठांच्या चिठ्ठीद्वारे मुख्यमंत्री पदाचे नाव पक्के झाल्याचे आपण ऐकलेलेच आहे. आता नितीश कुमार आणि तेजस्वी दोघे एकत्र येऊनही सरकार बनवू शकत नाहीत कारण सरकार बनवणे हा आकड्यांचा खेळ आहे. हे सर्व विवरण विचारात घेतल्यावर एका गोष्टीचा नक्कीच विचार केला पाहिजे. ती गोष्ट म्हणजे भारतीय जनता पक्षाची विजयी होण्यासाठी असलेली प्रयत्नांची पराकाष्टा आणि हा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. विरोधकांचे कोणतेही मुद्दे असो, कितीही कठीण परिस्थिती असो. प्रतिकूल वेळेतही मतदारांना आकर्षित करण्यासाठी जे जे करायचे ते बिनघोरपणे करून विरोधकांना घोर चिंतेत ठेवून शेवटच्या क्षणी आपटणे यामध्ये आता भारतीय जनता पक्ष तरबेज झाला आहे. आजच्या निकालाचे विश्लेषण केल्यावर एकच गोष्ट लक्षात राहण्यासारखी आहे. ती म्हणजे सगळ्या एक्झिट पोलवाल्यांची पोलम्पट्टी उघड झालेली आहे. हे जग उगवत्या सूर्याला नमस्कार करते. बिहारमध्ये विजयाचा सूर्य उगवला आहे, त्या विजयाला नमस्कार!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## महाआघाडीचे सपशेल पानिपत

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. १४ :

बिहार निवडणुकीत भाजपा-जदयूच्या आघाडीचा दणदणीत विजय झाला असून एनडीएला २०० हून अधिक जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रीय जनता दलाला मोठा झटका मिळाला असून काँग्रेसचेही पानिपत झाले आहे. लालू प्रसाद यादव यांचे ज्येष्ठ पुत्र आणि माजी उपमुख्यमंत्री तेजप्रताप यादव यांचाही दणदणीत पराभव झाला आहे. काही महिन्यांपूर्वी लालू प्रसाद यादव यांनी तेजप्रताप यांना पक्ष आणि कुटुंबातून बेदखल केले होते. त्यानंतर त्यांना राजकारणातही मोठा धक्का बसला आहे. तेजप्रताप यादव यांना पक्षातून बाहेर काढल्यानंतर त्यांनी जनशक्ती जनता दल या पक्षाची स्थापना केली होती. ते स्वतः महुआ विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीला उभे राहिले होते. मात्र या मतदारसंघात त्यांना पराभवाचे तोंड पाहावे लागले आहे.

महुआ विधानसभा मतदारसंघात लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास) उमेदवार संजय कुमार सिंह यांचा विजय झाला आहे. संजय कुमार सिंह यांनी ८७,६४१ मते मिळवली आहेत. तर दुसऱ्या स्थानावर असलेल्या राष्ट्रीय जनता दलाचे मुकेश कुमार रौशन यांना ४२,६४४ मते मिळाली आहेत. तर तेजप्रताप यादव यांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे. त्यांना ३५,७०३ मते मिळाली आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, जर आरजेडीने या जागेवर उमेदवार दिला नसता तर कदाचित तर लोजपचे उमेदवार संजय कुमार सिंह आणि तेजप्रताप यादव यांच्यात कडवी टक्कर पाहायला मिळाली असती. मात्र तेजस्वी यादव यांनी मुकेश कुमार यांना तिकीट दिल्यामुळे मतविभाजनाचा फटका बसून तेजप्रताप यांचा पराभव झाला. एनडीएने यापैकी १२५ जागा जिंकल्या आहेत. महाआघाडीने १७ जागा जिंकल्या आहेत, तर ओवेसींच्या पक्ष एआयएमआयएमने पाच जागा जिंकल्या आहेत. एनडीएने जिल्ह्यातील ७ पैकी ६ विधानसभा जागा जिंकल्या. सीपीआय (एमएल)चे डॉ. अरुण कुमार कुशवाह यांनी कराकटमध्ये आपला विजय कायम ठेवला. २०२० च्या निवडणुकीत रोहतास जिल्ह्यात एनडीएचा पूर्णपणे सफाया झाला होता.





### कैमूरमध्ये मतमोजणी केंद्राबाहेर दगडफेक

कैमूरमधील मतदान मोजणी केंद्राबाहेर झालेल्या दगडफेकीत दोन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. रामगड विधानसभा मतदारसंघात गेल्या दीड तासापासून मतमोजणी थांबवण्यात आली आहे. बसप नेते सतीश यादव यांनी मतमोजणीत अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे.

* भाजप - ९४ जागांवर आघाडीवर
* जेडीयू - ८५ जागांवर आघाडीवर
* राजद - २९ जागांवर आघाडीवर
* लोजपा (आर) - २० जागांवर आघाडीवर
* काँग्रेस - ६ जागांवर आघाडीवर
* एआयएमआयएम - ५ जागांवर आघाडीवर
* एचएएम - ४ जागांवर आघाडीवर
* सीपीआयएमएल - ४ जागांवर आघाडीवर
* आरएलएम - ४ जागांवर आघाडीवर
* सीपीआयएम - १ जागेवर आघाडीवर
* बसपा - १ जागेवर आघाडीवर

## बिहार निवडणुकीमुळे निवडणूक आयोगावरील जनतेचा विश्वास अधिक मजबूत झाला : मोदी

बिहार निवडणुकीच्या प्रचारावेळी विरोधकांकडून सातत्यानं निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर शंका उपस्थित करण्यात येत होती, विरोधकांकडून निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करण्यात आले, दरम्यान आज बिहार निवडणुकीचा निकाल लागला आहे, बिहारमध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळालं आहे, त्यानंतर आता जनतेशी संवाद साधताना या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. बिहार निवडणुकीमुळे जनतेचा निवडणूक आयोगावरील विश्वास आणखी मजबूत झाल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांपासून सातत्याने प्रचंड मतदान होतंय. वंचित आणि शोषितांनी अधिक मतदान करणं हे निवडणूक आयोगाचं मोठं यश आहे, असंही यावेळी मोदी यांनी म्हटलं आहे.

## दिल्लीत बिहार निवडणूक विजयाचा जल्लोष

पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील भाजप मुख्यालयात पोहोचले आहेत. त्यांनी मफलर हलवून कार्यकर्त्यांचे स्वागत केले. यावेळी सर्व कार्यकर्त्यांनीही मफलर हलवले.

बिहारमध्ये एनडीए सरकार स्थापन झाले आहे. युतीने २४३ पैकी २०२ जागा जिंकल्या, जो एक विक्रम आहे. महाआघाडीला फक्त ३४ जागा मिळाल्या. बिहारमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी १२२ जागा आवश्यक आहेत. एनडीएमध्ये, भाजप आणि जेडीयूने प्रत्येकी १०१ जागा लढवल्या. इतर मित्रपक्ष, एलजेपीला २९ जागा आणि एचएएम आणि आरएलएमला प्रत्येकी सहा जागा देण्यात आल्या. भाजपने ९१ जागा जिंकल्या. जेडीयूने ८३, एलजेपीने १९ आणि एचएएम आणि आरएलएमने मिळून नऊ जागा जिंकल्या.

एनडीएने राज्यात सर्वांगीण विकास घडवून आणला आहे. जनतेने आम्हाला प्रचंड बहुमत दिले आहे, आमचा ट्रॅक रेकॉर्ड आणि राज्याला नवीन उंचीवर नेण्याचे आमचे स्वप्न ओळखून. या शानदार विजयाबद्दल मी मुख्यमंत्री नितीश कुमार आणि आमचे एनडीए सहयोगी चिराग पासवान, जितन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांचे मनापासून अभिनंदन करतो.

या वर्षी ८ फेब्रुवारी रोजी दिल्ली विधानसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी पक्षाच्या मुख्यालयाला भेट दिली. त्यापूर्वी, हरियाणा विधानसभा निवडणूक, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आणि लोकसभा निवडणूक जिंकल्यानंतर मोदींनी भाजप कार्यालयाला भेट दिली होती.

## बिहारचा निकाल काँग्रेसच्या विषारी प्रचाराला जनतेचे उत्तर : मुख्यमंत्री

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :



बिहारच्या निवडणुकीत भाजप व एनडीए आघाडीवर असून जवळपास विजय हा निश्चितच झाल्याचे दिसत आहे. यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशात जो विषारी प्रचार चालवला आहे, त्याला जनतेने उत्तर दिल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस हे राजधानी दिल्ली येथे असून पत्रकारांशी संवाद साधताना बिहार निवडणुकीवर प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाजप आणि एनडीए या सर्व घटक पक्षांच्या बिहार युनिटचे मी अभिनंदन करतो आणि बिहारच्या जनतेचे आभार मानतो. त्यांनी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन, नितीश कुमार यांच्या सुशासनावर विश्वास ठेऊन आणि आमच्या घटक पक्षाला त्या ठिकाणी एनडीएच्या माध्यमातून प्रचंड मोठे बहुमत दिले आहे. २०१० चा सुद्धा रेकॉर्ड तुटू शकेल इतके बहुमत मिळाले आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, दुसरे महत्त्वाचे असे आहे की या विजयानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशात जो विषारी प्रचार चालवला आहे, त्याला जनतेने उत्तर दिले आहे.

## सुरक्षा दलांनी काश्मीरमध्ये दहशतवादी नबीचे घर उडवले

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात, सुरक्षा दलांनी गुरुवारी रात्री पुलवामा येथील दहशतवादी डॉ. उमर नबीचे घर आयईडी स्फोटाने उडवून दिले. गुरुवारी डीएनए मॅचिंगमध्ये स्फोट झालेली गाडी डॉ. उमर चालवत असल्याचे स्पष्ट झाले.

गुरुवारी, गुप्तचर संस्थांनी उघड केले की आतापर्यंत अटक केलेल्या आठ दहशतवाद्यांनी सांगितले होते की त्यांचा बाबरी मशीद पाडल्याचा बदला घेण्यासाठी ६ डिसेंबर रोजी दिल्लीसह देशभरातील विविध ठिकाणी बॉम्बस्फोट करण्याचा हेतू होता. या उद्देशाने त्यांनी ३२ कारची व्यवस्था केली होती. या कार बॉम्ब आणि स्फोटकांनी भरून स्फोट करायच्या होत्या.

आय२०, इकोस्पोर्ट आणि ब्रेझा कार या कटाचा भाग होत्या. १० नोव्हेंबर रोजी दिल्ली बॉम्बस्फोटात आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे, तर २० जण जखमी झाले आहेत, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

## एकाच कुटुंबातील पाच जण मृतावस्थेत आढळले

■ वृत्तसंस्था, श्रावस्ती, दि. १४

सकाळी बराच वेळ दरवाजा न उघडल्याने नातेवाईकांना संशय आला. त्यांनी खिडकीतून पाहिले असता आत भीषण दृश्य दिसले. घरातील सर्व सदस्य निष्प्राण अवस्थेत होते. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. कोणतेही बाह्य जखमेचे चिन्ह किंवा मोठा गोंधळ घरात दिसून आला नाही, त्यामुळे घटनेभोवती संशयाचे धुके आणखी दाटले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिसराला सुरक्षा कवच देत फॉरेन्सिक तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. त्यांनी खोलीची तळमळून तपासणी सुरू केली आहे. प्राथमिक चौकशीतही कुटुंबातील इतर सदस्यांकडे काही ठोस माहिती नाही. दरम्यान, कुटुंबातील नफीस नावाच्या युवकाबाबतही वेगळी माहिती पुढे आली आहे.

## 32 गाड्या हल्ल्यासाठी तयार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४

दिल्लीतील लाल किल्ला स्फोटांच्या तपासात दहशतवाद्यांनी आखलेली भयंकर योजना उघड झाली आहे. आतापर्यंत फक्त चार गाड्या व्हाईट कॉलर दहशतवाद प्रकरणाशी जोडल्या गेल्या होत्या, मात्र आता समोर आले आहे की जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांनी एकूण ३२ गाड्या तयार केल्या होत्या. या गाड्या ६ डिसेंबर रोजी अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्याच्या ३३ व्या वर्धापन दिनानिमित्त हल्लयासाठी वापरण्याचा कट रचला होता.

तपासात समोर आले आहे की या गाड्या स्फोटके आणि बॉम्ब वाहून नेण्यासाठी वापरण्यात येत होत्या. सोमवारी लाल किल्ल्याजवळ घडलेल्या स्फोटात वापरलेली आय२० कार यामध्ये समाविष्ट होती. तसेच, मारुती सुझुकी ब्रेझा, मारुती स्विफ्ट डिझायर आणि फोर्ड इकोस्पोर्ट या गाड्या देखील पोलिसांनी जप्त केल्या आहेत. हल्ल्यांसाठी निवडलेल्या ठिकाणांपैकी सहा ठिकाणे दिल्लीमध्ये होती. जप्त झालेल्या गाड्या जुनी आणि अनेक हातांमधून गेल्यामुळे पोलिसांसाठी दहशतवाद्यांपर्यंत पोहोचणे कठीण झाले होते.

विशेष म्हणजे, चौथी जप्त गाडी, मारुती सुझुकी ब्रेझा फरिदाबादमधील अल-फलाह स्कूल ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरमधून जप्त करण्यात आली, जी "दहशतवाद विद्यापीठ" म्हणून ओळखली जाते. बुधवारी संध्याकाळी फरिदाबादमधून एक फोर्ड इकोस्पोर्टदेखील जप्त करण्यात आली होती.

याआधी सोमवारी मारुती स्विफ्ट डिझायर जप्त करण्यात आली होती, ज्यामध्ये एक असॉल्ट रायफल आणि दारूगोळा सापडला होता. या प्रकरणामुळे दिल्लीतील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, दहशतवाद्यांच्या पुढील योजना तपासण्याचे काम सुरू आहे.



## बिहारमध्ये महाराष्ट्राचे फंडे वापरले गेले : बाळासाहेब थोरात



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी एनडीएच्या बिहारमधील विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बिहारमध्ये महाराष्ट्रात वापरण्यात आलेले फंडेच वापरण्यात आले. यामुळे तेथील निवडणूक प्रक्रिया निकोप होती का? हा प्रश्न उपस्थित होत आहे, असे ते म्हणालेत. बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीए विजयाच्या दिशेने वाटचाल करत आहे. या निकालाचे संपूर्ण देशात पडसाद उमटत आहेत. सत्ताधारी पक्ष विशेषतः भाजपने मतचोरीच्या मुद्यावरून काँग्रेससह संपूर्ण विरोधकांवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी एनडीएच्या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले, महाराष्ट्रातील फंडे बिहारमध्ये वापरले गेले. त्यामुळे लोकशाहीसाठी अशी निवडणूक प्रक्रिया खरेच योग्य आहे का? याचा विचार जनतेने केला पाहिजे.

## बिहार निवडणुकीने मतमोजणीत घोळ होतो यावर शिक्कामोर्तब



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालामुळे मतमोजणीत घोळ होत असल्यावर शिक्कामोर्तब झाल्याचा दावा केला आहे. सरकारचे बुजगावणे झालेली यंत्रणा व निवडणूक आयोग यामुळे लोकशाही व पर्यायाने आरक्षण व संविधान धोक्यात आले आहे, असे ते म्हणालेत. बिहार विधानसभा निवडणुकीत राजद व काँग्रेसच्या महाआघाडीचा पार धुव्वा उडाला आहे. तिथे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकार पुन्हा एकदा सत्तेत येण्याची शक्यता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी मतमोजणीत घोळ झाल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, हरियाणा, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीकडे जनतेचा कौल होता. हे चित्र पोस्टल मतदानात देखील स्पष्ट झाले होते. एश्ट व्होटिंगदरम्यान पहिला एक तास हा कल पोस्टलप्रमाणेच राहिला. परंतु पुढच्या एक दीड तासात सर्व चित्र पालटले. भाजपा आश्चर्यकारक रित्या पुढे गेली आणि धक्कादायक निकाल समोर आला. आज सेम-टू-सेम याच पद्धतीचे चित्र बिहार निवडणुकीचे निकाल येताना दिसत आहे. येणाऱ्या निकालाने मतदान मोजणीत घोळ होतो यावर शिक्कामोर्तब झालं आहे.

## मत चोरीचा फेक नरेटिव्ह कोसळला
## अमित साटम यांची टीका



**मुंबई :** बिहार विधानसभा निवडणुकांचे निकाल समोर आले असून एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. बिहारमधील 243 जागांपैकी जवळपास 200 पेक्षा जास्त जागांवर भाजप-जदयू आघाडीचे उमेदवार निवडून आले आहेत. दुसऱ्या बाजूला काँग्रेस-आरजेडी महागठबंधन फक्त 35 च्या आसपास जागांवर समाधान मानावे लागले आहे. बिहारमध्ये एनडीएचा असा मोठा विजय मिळाल्यानंतर महाराष्ट्रातील 2025 च्या विधानसभा निवडणुकांची आठवण अनेकांना झाली आहे. कारण दोन्ही राज्यांत विरोधकांच्या मोठ्या लाटेच्या दाव्यांना निकालांनी छेद दिला आहे. बिहारचे राजकीय चित्र स्पष्ट होताच महाराष्ट्रातील नेत्यांनीही यावर प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली असून भाजप नेत्यांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. बिहारमधील निकाल जाहीर होताच भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनीही या राजकीय घडामोडींवर भाष्य केले. वोट चोरीचा मुद्दा उचलून विरोधकांनी जनतेची दिशाभूल केली, पण बिहारी जनतेने निकालातूनच स्पष्ट संदेश दिला, असे साटम यांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते, विरोधकांकडून उभा केलेला वोट चोरीचा कथित कथानक म्हणजे जनतेचाच अपमान असून निकालानंतर हा संपूर्ण मुद्दा कोसळला आहे. साटम यांनी म्हटले की बिहारची निवडणूक म्हणजे फक्त ट्रेलर आहे आणि खरा चित्रपट मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत पाहायला मिळेल. त्यांच्या वक्तव्याने मुंबईतील आगामी निवडणुकीसाठी भाजपने आपला सूर अधिक आक्रमक ठेवला आहे, हे स्पष्ट झाले. दुसरीकडे, शिवसेना आणि काँग्रेसकडूनही या निकालांची वेगवेगळ्या पद्धतीने व्याख्या करण्यात आली. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आपल्या प्रतिक्रियेत केंद्र सरकार, यंत्रणा आणि स्वायत्त संस्थांवरच या निकालाचे श्रेय टाकले. त्यांचा आरोप असा की, सत्ताधाऱ्यांनी वातावरण तयार करणे, विरोधकांचे आवाज दाबणे आणि सरकारी संस्थांचा प्रभाव वापरणे यामुळे निकाल एका बाजूला झुकला. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी तर निवडणूक आयोगाचा दाखला देत बिहारचे चित्र आणि महाराष्ट्रातील काही जुन्या प्रसंगांची तुलना केली.

# शिवसेना ठाकरे गट आणि भाजपमध्ये राडा

### अनिल परबांचा आक्रमक पवित्रा, हॉटेल ताज लँडच्या बाहेर शिवसैनिकांचा गोंधळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**



शिवसेना ठाकरे गट आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये मुंबई येथील हॉटेल ताज लँडच्या बाहेर राडा झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी ठाकरे गटाचे आमदार व नेते अनिल परब देखील आक्रमक भूमिकेत पाहायला मिळाले. शिवसेना ठाकरे गटाच्या भारतीय कामगार सेनेच्या कामगारांची फसवणूक करत भाजप प्रणीत संघटनांमध्ये घेत असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला. त्यानंतर शिवसैनिक हॉटेलच्या बाहेर जमले असता गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले.

अखिल भारतीय कर्मचारी संघ ही भाजप प्रणीत संघटना आहे, तर भारतीय कामगार सेना ही शिवसेनेची संघटना आहे. या दोन्ही संघटनांमध्ये वाद झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते हॉटेल ताज येथे दाखल झाले होते. यावेळी त्यांच्यासोबत अनिल परब देखील उपस्थित होते. ताज लँड हॉटेलमध्ये भाजपच्या प्रतिनिधींना जाब विचारण्यासाठी अनिल परब त्या ठिकाणी आले असता त्यांना पोलिसांनी अडवले. त्यानंतर परब यांचा रुद्रावतार पाहायला मिळाला.

कोणत्याही परिस्थितीत मी माझ्या कार्यकर्त्यांना अडवू शकत नाही, असे म्हणत अनिल परब यांनी पोलिसांनाच जाब विचारला. यामुळे येथे काही वेळासाठी गोंधळ निर्माण झाला होता. यावेळी भाजप नेत्यांशी चर्चा करण्यासाठी फक्त अनिल परब आणि इतर काही लोकांनीच जावे असे पोलिसांनी सांगितले. त्याला अनिल परब यांनी विरोध केला. माझ्यासोबत किमान 25 लोक मी आतमध्ये घेऊन जाणार. सत्तेत आहेत म्हणून त्यांना इतका माज आलाय का? असा संतप्त सवाल अनिल परब यांनी उपस्थित केला.

भारतीय कामगार सेनेच्या कार्यकर्त्यांना फसवून भाजपच्या अखिल भारतीय कर्मचारी संघात घेतले जात असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. कामगारांना फसवून त्यांच्या सह्या घेण्यात आल्याचा आरोप अनिल परब यांनी केला. भाजपकडून हॉटेलमध्ये चुकीच्या पद्धतीने कामगार संघटना स्थापन करण्यात आली आहे, त्यात शिवसेनेच्या कामगार संघटनेच्या कामगारांच्या सह्या फसवून घेतल्याचा दावा परब यांनी केला.

### बिहारमध्ये पराभव, महाराष्ट्रात भूकंप!
# काँग्रेसला मोठा झटका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल हाती आला असून, महाआघाडीला मोठा पराभव झेलावा लागला आहे. एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले असून, आतापर्यंत मिळालेल्या निकालानुसार भाजप बिहारमधील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपचे उमेदवार तब्बल 96 जागांवर आघाडीवर आहेत, तर जेडीयूला देखील मोठं यश मिळालं असून ती 84 जागांवर आघाडीवर आहे. महाआघाडीच्या घटकपक्षांमध्ये काँग्रेसची अवस्था बिकट आहे; काँग्रेस फक्त दोन जागांवर आघाडीवर आहे. बिहारमधील या पराभवानंतर आता महाराष्ट्रातही काँग्रेसला मोठा झटका बसला आहे, बड्या नेत्याने पक्षाची साथ सोडली आहे.

ठाणे जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरगे यांनी तडकाफडकी काँग्रेसमधून राजीनामा दिला आहे. दयानंद चोरगे हे मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे भिवंडीतील उमेदवार होते. आपल्या पत्रात त्यांनी वैयक्तिक कारणांचा उल्लेख केला असून, तरीही अनेक दिवसांपासून पक्षावर नाराज असल्याची माहिती आहे. त्यांनी अनेक निवडणुकांमध्ये डावलं गेल्याची खंत व्यक्त केली होती. बिहारच्या निकालानंतर दयानंद चोरगे यांनी पक्षाचा आणि जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला, ऐन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.

बिहार निवडणुकीत महाआघाडी फक्त 29 जागांवर आघाडीवर राहिली, तर आरजेडी या घटकपक्षाला 25 जागांवर आघाडी मिळाली. काँग्रेस फक्त दोन जागांवर आघाडीवर आहे, त्यामुळे काँग्रेसमुळेच आरजेडीला अपेक्षित यश मिळाले नाही, अशी चर्चा सुरु झाली आहे. या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून जेडीयू दुसऱ्या क्रमांकावर आहे. जेडीयूपेक्षा भाजपच्या जागा अधिक असल्यामुळे बिहारमध्ये मुख्यमंत्री कोण होणार, याबाबत राजकीय उत्सुकता निर्माण झाली आहे.

## भाजपचा छुपा अजेंडा नितीशकुमारांना दूर करण्याचा : हर्षवर्धन सपकाळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**



बिहारमध्ये काही दिवस भाजपवाले नितीशकुमार यांनाच मुख्यमंत्री ठेवतील त्यानंतर मात्र भाजपचा मुख्यमंत्री होईल. मित्र पक्षांना संपवणे हा त्यांचा अजेंडा आहे. नितीशकुमार यांना ते सोडतील असे मला वाटत नाही. नितीश कुमारांसोबत बिहारमधील मागासवर्ग आणि महिलांची ताकद आहे. त्यामुळे तिथे सत्ता बदल झाला नाही. त्यांची तब्येत बरी नाही म्हणून त्यांना भाजप टकमक टोकाकडे घेऊन जाईल. लगेच नितीशकुमारांना दूर करणे भाजपला परवडणारे नाही पण त्यांना दूर करणे हाच भाजपचा छूपा अजेंडा आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, आज पराभव झाल्यानंतर आमच्या मित्रपक्षांच्या नेत्याने आमच्यावर टीका करणे हे घाईघाईने आहे.बिहारमध्ये काँग्रेस कमी जागेवर लढली हे देखील खरे आहे. राहुल गांधी तिथले सर्वात मोठे प्रचारक होते. या निकालाकडे महाराष्ट्राच्या किंवा बिहारच्या चश्मा तून न बघता देशाच्या लोकशाहीवर भाजप नावाचे जे संकट आले आहे, विरोधी पक्ष या नात्याने त्याकडे पाहिले पाहिजे.बिहारच्या संदभार्ने आज बोलणं गरजेचे नाही. अंबादास दानवे यांना कदाचित बिहारमधील माहिती नसावी म्हणून ते घाईघाईने काही तरी बोलत आहेत. बिहारमध्ये ठरलेल्या तारखेवर मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर झाला आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, बिहारच्या निकालाच्या संदभार्ने महाराष्ट्रात चूक झाली असे अंबादास दानवे यांचे वक्तव्य योग्य नाही या निकाला धरुण महाराष्ट्रावर बोलणं अयोग्य बिहारमध्ये ज्या गोष्टी जशा ठरल्या होत्या त्या तशाच केल्या गेल्या.

### भारतातील सर्वात मोठा कम्युनिटी लीड बिझनेस एक्स्पो
## एमईए आंतरराष्ट्रीय बिझनेस एक्स्पो पुण्यात आयोजित

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :**




पुण्यात 27, 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च 2026 रोजी एमईए आंतरराष्ट्रीय बिझनेस एक्स्पो 2026 चे आयोजन करण्यात येणार आहे. कृषी मैदानावर होणा?्या या एक्स्पोची घोषणा मराठा उद्योजक संघटना (एमईए) च्या वतीने कार्यकारी अध्यक्ष विक्रम गायकवाड आणि क्रेडाई राष्ट्रीयचे माजी अध्यक्ष सतीश मगर यांनी पत्रकार परिषदेत केली. एकतेपासून समृद्धीकडे या संकल्पनेवर आधारित हा भारतातील सर्वात मोठा कम्युनिटी लीड बिझनेस एक्स्पो असेल.

मराठा समाजात उद्योजकता वाढवणे आणि तरुणांना उद्योग क्षेत्रातील सखोल ज्ञान देणे हा एमईएचा गेल्या 14 वर्षांपासूनचा उद्देश आहे. याच ध्येयाचा भाग म्हणून हे आंतरराष्ट्रीय एक्स्पो आयोजित केले जात आहे. परदेशातील मराठा उद्योजक, व्यावसायिक आणि नेते यांना एकत्र आणण्याचा यशस्वी प्रयत्न यातून होईल, असे गायकवाड यांनी सांगितले.या एक्स्पोमध्ये बांधकाम, उत्पादन, आयटी, एफएमसीजी, कृषी-तंत्रज्ञान, जीवनशैली, शिक्षण, आदरातिथ्य, सेवा, आयात-निर्यात, ऑटोमोबाईल, आरोग्य, बँकिंग-वित्त अशा विविध क्षेत्रांचा समावेश असेल. 500 हून अधिक स्टॉल्स, आंतरराष्ट्रीय व्यापारी संस्था, सरकारी प्रतिनिधी, धोरणकर्ते आणि तज्ज्ञ यांची उपस्थिती हे या एक्स्पोचे वैशिष्ट्य असेल.

हे व्यासपीठ उद्योजकांना व्यवसायवृद्धी, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी संपर्क, ब्रँड जागतिकीकरण, नव्या बाजारपेठा शोधणे आणि तज्ज्ञांचे ज्ञान मिळवणे यांसारख्या अनेक संधी उपलब्ध करून देईल. एमईएचे माजी अध्यक्ष अरुण निम्हण, सचिव राजेश कु-हाडे, सई बहिरट पाटील, नितीन भोसले, सागर तुपे आदी यावेळी उपस्थित होते.

गायकवाड यांनी सांगितले की, एमईए संघटना मागील 15 वर्षांहून अधिक काळ मराठा समुदायाच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी कार्यरत आहे. एमईएकडे 2000 हून अधिक सदस्य आणि 200 यशस्वी कार्यक्रमांचा विक्रम आहे.

## शहरांच्या जवळील रस्त्यांचे सुरक्षा ऑडिट करा

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :**



सुप्रिया सुळेंची मागणी

पुण्यातील नवले पुलाजवळ सोमवारी झालेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षेचा मुद्दा गंभीरपणे समोर आणला आहे. या अपघातात काही नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले. याआधीही या ठिकाणी अनेकदा अपघात होऊन जीवितहानी झाली आहे. या सततच्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारकडे महत्त्वाची मागणी केली आहे. शहरांच्या जवळून जाणाऱ्या रस्त्यांची तातडीने सुरक्षा ऑडिट करण्याची तसेच प्रलंबित असलेली पायाभूत कामे तातडीने सुरू करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे.

खासदार सुळे यांनी या संदर्भात एक सविस्तर पोस्ट करत नवले पूल परिसरातील वारंवार होणाऱ्या अपघातांबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, या ठिकाणी मागील काही वर्षांत अनेक अपघात झाले असून त्यात अनेकांनी प्राण गमावले आहेत. अशा घटना वारंवार होण्यामागे रस्त्यांची रचना, वाहतूक कोंडी, वेगावर नियंत्रण नसणे आणि सुरक्षा उपाययोजनांचा अभाव हे प्रमुख मुद्दे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी रस्ते सुरक्षित बनवणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी मांडले. या पोस्टमध्ये सुळे यांनी नऱ्हे ते रावेत या मार्गावरील एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामाचा मुद्दाही उपस्थित केला. या मार्गासाठी मंजुरी मिळूनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याचे त्यांनी सांगितले. नवले पूल परिसरात वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने एलिव्हेटेड मार्ग केवळ पर्याय नाही तर अत्यावश्यक गरज बनली आहे. या प्रकल्पामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. एलिव्हेटेड मार्ग सुरू झाल्यास मोठ्या प्रमाणावर रस्त्यावरील दबाव कमी होऊन पर्यायी मार्ग उपलब्ध होतील, असे त्यांनी नमूद केले.

खासदार सुळे यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना या संदर्भात नम्र विनंती केली आहे. नऱ्हे ते रावेत दरम्यानच्या एलिव्हेटेड मार्गाचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला द्याव्यात, अशी विनंती त्यांनी पोस्टमध्ये केली. तसेच, रस्ते सुरक्षेसाठी राष्ट्रीय स्तरावर एक विशेष मोहिम राबवण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. अपघात टाळण्यासाठी वेग मर्यादा, वाहतूक चिन्हे, रस्त्यांची दुरुस्ती आणि जागरूकता मोहिमा प्रभावीपणे राबवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

## फॉर्च्युनरमध्ये गोळ्या झाडल्या रस्त्यावर फेकले आणि चिरडले

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :**

महाराष्ट्रातील पुण्यात एका मित्राने त्याच्या मित्राच्या डोक्यात गोळी झाडून त्याची हत्या केली. संपूर्ण घटना घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. यावरून पोलिसांनी आता हत्येच्या दोन गुन्हेगारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बुधवारी सायंकाळी ७:५७ वाजता पिंपरी चिंचवड परिसरातील दिघी आळंदी रोडवर घडली. ३७ वर्षीय नितीन गिलबिले याचा दोन गोळ्या लागल्याने जागीच मृत्यू झाला. दिघी पोलिसांनी संशयित अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल केला आहे. नितीनच्या हत्येबाबत, पोलिसांना आर्थिक वादातून अमित आणि विक्रांतने त्याची गोळी झाडून हत्या केल्याचा संशय आहे. घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात असे दिसून आले आहे की नितीनच्या डोक्यात गोळी झाडल्यानंतर विक्रांतने त्याला फॉर्च्युनरच्या पुढच्या सीटवरून बाहेर काढले, रस्त्यावर फेकले, नितीनचे पाय चिरडले आणि अमितला घेऊन पळून गेला. त्याच्या कुटुंबाने दिघी पोलिस ठाण्यात अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांच्याविरुद्ध हत्येची तक्रार दाखल केली.

## केमिकल कंपनीला भीषण आग

■ **महासागर प्रतिनिधी जळगाव, दि. १४ :**

औद्योगिक वसाहतीत एका केमिकल कंपनीला शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अचानक मोठी आग लागली. परिसरातील नगर परिषदांच्या बंबांद्वारे आग विझविण्याचे काम करण्यात आले. औद्योगिक वसाहतीत आर. एल. चौफुलीजवळ एन सेक्टरमध्ये आर्यव्रत केमिकल कंपनी आहे. कंपनीतील कामगार कामात व्यस्त असताना, अचानक भीषण आग लागली. आगीच्या घटनेनंतर घटनास्थळी जळगाव महानगरपालिकेसह जैन इरिगेशन तसेच वरणगाव, भुसावळ, जामनेर, नशिराबाद नगर परिषदांचे अग्नीशमन बंब दाखल झाले.

### नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही
## राज्य निवडणूक आयोगाचा दिलासा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**




नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर उमेदवारांनी फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरावी. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत घेवून व त्यावर सही करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करावी असा दिलासा राज्य निवडणूक आयोगाने गुरुवारी दिला. आयोगाच्या या निर्णयामुळे इच्छूक उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया किटकट असून ऑनलाईन अर्ज भरतांना अडचणीत येत असल्याचे सांगत ही प्रक्रिया ऑफलाईन करण्याची मागणी काँग्रेसह विरोधी पक्षांनी केली होती.

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत आयोगास पत्र पाठवून उमेदवारांचा अर्ज २० पानी असून त्यात आयोगाकडे उपलब्ध असणाराही माहिती मागविण्यात आली आहे. अर्ज भरण्याची प्रक्रिया किटकट असून त्यात सुधारणा करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली होती. त्याची दखल घेत आयोगाने आपल्या प्रक्रियेत सुधारणा केली आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून त्याची मुद्रित प्रत काढून त्यावर उमेदवाराची स्वतःची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषणापत्र, निवडणुकीसाठी बॅंक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जातप्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास जोडपत्र- १ किंवा जोडपत्र- २ इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

# फिल्मी स्टाईल हत्येचा प्लॅन
## बहिणीच्या प्रियकरावर झाडल्या गोळ्या

■ **महासागर प्रतिनिधी, पिंपरी- चिंचवडः , दि. १४ :**



बहिणीच्या प्रियकराची हत्येची सुपारी देऊन हत्येचा प्रयत्न करणाऱ्यासह तिघांना गुंडा विरोधी पथकाने अटक केली आहे. हत्येची दहा लाखांची सुपारी देऊन तरुणीचा भाऊ गोव्याला आणि चुलता कोल्हापूरला देवदर्शनासाठी निघून गेला. या प्रकरणात सुपारी किल्लर आकाश भोकसे यांच्यासह तरुणीचा भाऊ अभिजित केदारी आणि चुलता नितीन केदारी ला अटक केली आहे. विकास केदारी हा जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याच्या मानेत गोळी शिरली आहे. याबाबत किरण बाळासाहेब केदारी यांनी तक्रार दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास केदारी आणि अभिजित केदारीच्या बहिणीचे प्रेमसंबंध होते. अनेकदा समजावूनही विकास तिच्यापासून दूर होत नव्हता. तो प्रेयसीला सोडायला तयार नव्हता. अखेर चित्रपटात साजेशी हत्येची योजना (प्लॅन) करण्यात आली.

अभिजित आणि नितीन यांनी सराईत गुन्हेगार आकाश भोकसे ला विकास च्या हत्येची दहा लाखांची सुपारी दिली. त्याला ठार मारण्याचा प्लॅन ठरला. हत्येची सुपारी देऊन भाऊ अभिजित गोव्याला आणि चुलता नितीन केदारी हा कोल्हापूरला देवदर्शनाला निघून गेला.

११ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा च्या सुमारास पुणे- मुंबई द्रुतगती मार्गाजवळ काही अंतरावरून विकासच्या दिशेने जीवे मारण्याच्या उद्देशाने पिस्तूलातून गोळी झाडली. गोळी विकासच्या मानेत शिरली सुदैवाने तो थोडक्यात बचावला आहे. विकासवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याच्या शरीराचा खालील भाग काम करेनासा झाला आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. अभिजित, नितीन आणि आकाश यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शिरगाव पोलीस आरोपींचा शोध घेत होते. अखेर गुंडा विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांच्या टीमने आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणाहून बेड्या ठोकल्या आहेत.

## नवले पुलावरील अपघातास जबाबदार असणाऱ्या ट्रक चालकासह तिघांविरुद्ध गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. १४ :**

नवले पुलावर गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातास जबाबदार असलेल्या ट्रक चालकासह तिघांविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अपघातास जबाबदार असणाऱ्या ट्रक चालकासह क्लिनरचा होरपळून मृत्यू झाला.

या प्रकरणी ट्रक चालक रुस्तम रूदार खान (वय ३५, रा. किरवारी, किसनगड, जि. खेरतल, राजस्थान), मदतनीस (क्लिनर) मुस्ताक हनीफ खान (वय ३१, रा. मनापुरी, रासगड, जि. अलवर, राजस्थान), ताहीर नासीर खान (वय ४५, रा. किसनगड, राजस्थान) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक मधुकर तुपसौंदर यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अपघातात ट्रक चालक रुस्तम खान, क्लिनर मुस्ताक खान यांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अपघातात ताहीर खान गंभीर होरपळला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली. अपघातास जबाबदार असणाऱ्या ट्रक चालकासह तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०५, २८१, १२५ (अ), (ब), ३२४ (४), मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९, १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून आणि ब्रेक नादुरुस्त होऊन नवले पुलाजवळ गुरुवारी सायंकाळी भीषण अपघात झाला. या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर ९ ते १० जण गंभीररित्या जखमी झाले. गुरुवारी (१३ नोव्हेंबर) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सेल्फी पॉइंटजवळ झाला. घटनास्थळी अग्निशामक दलाच्या जवानांसह सिंहगड रस्ता पोलीस, वाहतूक पोलिसांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे.

# ‘शेअर ट्रेडिंगमध्ये 22 लाखांने फसवणूक

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 14)** अंजनगाव सुर्जी येथील एका 52 वर्षीय व्यक्तीला शेअर ट्रेडिंगच्या नावावर तब्बल 22 लाख 68 हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला. गणपती नगरातील अजय सुखलाल गौर यांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

30 सप्टेंबर रोजी फेसबुकवर दिसलेल्या एका आकर्षक लिंकवर क्लिक करताच अजय गौर हे ‘एससीएसआय’ नावाच्या कथित ट्रेडिंग ग्रुपमध्ये सहभागी झाले. काही दिवस ग्रुपची कामकाज पद्धत पाहिल्यानंतर को-ऑर्डिनेटर यालीनी गुना नामक तरुणाने त्यांच्याशी संपर्क साधला. तिने रजिस्ट्रेशन करून घेतले आणि एक इन्व्हेस्टर ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. सुरुवातीला फसवणूक करणाऱ्यांनी




कमी गुंतवणुकीत छोटासा नफा देऊन गौर यांचा विश्वास संपादन केला. यानंतर ‘दिवसाला 25 टक्के परतावा’ मिळणाऱ्या ओटीसी शेअर प्लॅनचे आमिष दाखवून गौर यांच्याकडून मोठी गुंतवणूक करून घेण्यात आली.

याचवेळी ग्रुपमधील एका महिलेने स्वत:ला ‘यशस्वी गुंतवणूकदार’ म्हणून दाखवत बनावट विड्रॉल पावत्या पाठवल्या आणि गौर यांचा विश्वास पूर्णपणे बसला. 28 ऑक्टोबरला खरेदी केलेल्या ओटीसी शेअर्सचा नफा घ्यायचा म्हटल्यावर त्यांच्या खात्यातील सर्व रक्कम अचानक एखाद्या ‘आयपीओ प्लॅन’मध्ये ट्रान्सफर झाल्याचे दाखवण्यात आले. वारंवार विड्रॉल रिक्वेस्ट नाकारल्या गेल्यावर आणि को-ऑर्डिनेटरशी संपर्क बंद झाल्यानंतर ही एक सुनियोजित फसवणूक असल्याचे उघड झाले. अंजनगाव सुर्जी पोलिसांनी या प्रकरणी चौघांवर गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# नगराध्यक्ष पदासाठी एक तर नगरसेवक पदासाठी अकरा उमेदवारी अर्ज दाखल

## कागदपत्र गोळा करण्याच्या चक्रव्युहात इच्छुकांचा रथ

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि. 14. )** – नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास आता अवघे दोनच दिवस उरले असताना, आज अर्ज स्वीकारण्याच्या पाचव्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी केवळ एक आणि नगरसेवक पदासाठी 11 उमेदवारी अर्ज दाखल झाले. त्यामुळे आवश्यक कागदपत्रांच्या चक्रावून टाकणाऱ्या प्रक्रियेमुळे इच्छुकांची गाडी पुढे सरकत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. शनिवारी आणि सोमवारी अर्ज दाखल करण्यासाठी प्रचंड गर्दी होणार हे निश्चित मानले जात आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत एकूण 28 नगरसेवकांची निवड होत आहे. महत्त्वाच्या राष्ट्रीय पक्षांकडून अपेक्षित प्रमाणात अर्ज येणे गरजेचे असताना आतापर्यंत केवळ 11 अर्जच दाखल झाले आहेत. अनेक इच्छुक उमेदवार पक्षाच्या अंतिम होकाराची प्रतीक्षा करत असल्याचे दिसून येते. तसेच निवडणूक आयोगाने मागितलेल्या कागदपत्रांची जुळवाजुळव करताना उमेदवारांची अक्षरश: दमछाक होत असल्याची चर्चा आहे. कमी वेळेत दस्तऐवज तयार करण्याचे मोठे आव्हान असल्याने अर्जांचे प्रमाण कमी राहिल्याचे मानले जात आहे. आज दि. 14 नोव्हेंबर रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत नगराध्यक्ष पदासाठी अविनाश गायकवाड यांनी भाजप तर्फे एकमेव अर्ज दाखल केला.



| नगरसेवक पदासाठी दाखल झालेले अर्ज |
| --- |
| प्रभाग 1 अ – रजनी नारायण पाटील (शिवसेना उ.बा.ठा) |
| प्रभाग 3 ब – नंदकिशोर नारायण रंधे (शिवसेना उ.बा.ठा) |
| प्रभाग 4 अ – सुनीता मनोहर मुरकुटे (भाजप) |
| प्रभाग 10 अ – प्रमोद नारायण धाकतोंडे (भाजप) |
| प्रभाग 11 अ – मो. आबिद शेख महेमूद (काँग्रेस) |
| मो. आबिद शेख महेमूद (राष्ट्रवादी काँग्रेस –शरद पवार गट) |
| प्रभाग 11 ब – अजीज मो. फैमोदीन (काँग्रेस) |
| अजीज मो. फैमोदीन (राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट) |
| प्रभाग 12 ब – मो. नाजिम मो. अयुब (अपक्ष) |
| प्रभाग 13 ब – शेख नासिर शेख इसा (राष्ट्रवादी काँग्रेस) |
| प्रभाग 14 अ – पुरुशोत्तम रामभाऊ तायडे (भाजप) |

दाखल झालेल्या अर्जांची माहिती निवडणूक अधिकारी राजेश्वर हांडे तसेच सहायक निवडणूक अधिकारी विजय लोहकरे व पुष्पा डाबेराव यांनी दिली. नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासाठी सर्व प्रभागनिहाय अधिकारी व कर्मचारी सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत उपस्थित होते. तसेच पोलिस ठाण्याचे ठाणेदार यांसह कर्मचारी बंदोबस्तासाठी हजर होते.

# नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धावपळ

## पांढुर्णा चौक ते महात्मा फुले चौक डिव्हायडरमध्ये कामाचा ‘स्पीड ब्रेकर’ नाही

### ठेकेदाराची बिले काढण्याची लगबग

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि. 14)** –नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर शहरात कामांच्या तडाख्याने धावपळ सुरू झाली आहे. पांढुर्णा चौक ते महात्मा फुले चौक या मुख्य मार्गावरील डिव्हायडरमध्ये काळी माती भरण्याचे काम ठेकेदाराकडून युद्धस्तरावर सुरू असून, या घाईगडबडीत गुणवत्ता आणि पारदर्शकतेचा बळी जाण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



नगराध्यक्ष बसण्याच्या अगोदरच ठेकेदाराकडून बिले काढण्याची लगबग सुरू झाली असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. नगराध्यक्षांची निवड झाल्यानंतर बिले मंजूर करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, याच भीतीपोटी प्रशासनाकडून कामांना वेग देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

शहरातील नागरिक मात्र या कामांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. अचानक निवडणूक लागली आणि कामांना वेग आला, इतक्या दिवस नगरपरिषदेच्या निधीला झोप लागली होती का? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. काही नागरिकांनी या कामांमध्ये पारदर्शकता ठेवण्याची मागणी केली असून, ठेकेदार आणि प्रशासन यांच्यातील आर्थिक देवाणघेवाणीवर देखील शंका व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, निवडणूक जाहीर झाल्यानंतर प्रशासनाने कोड ऑफ कंडक्टची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात मात्र ठेकेदारांकडून ‘शेवटच्या क्षणी’ कामे उरकण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.

शेवटी प्रश्न असा आहे की, निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेली ही ‘कामांची झेप’ नागरिकांसाठी विकास ठरणार का, की ठेकेदारांसाठी लाभाचा व्यवहार? याचे उत्तर येणाऱ्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

## बॅगेतून 12 हजार चोरी

**अमरावती** – शहरातील श्याम चौकातील एका बँकेतून महिलेने सोमवारी दुपारी 20 हजार रुपये काढले. त्यातील 12 हजार रुपये तिने बॅगेत ठेवले व 8 हजार रुपये जवळ ठेवले. दरम्यान बँकेच्या प्रवेशद्वारावर तिन अज्ञातांनी तिला लोटालोट करीत तिच्या नकळत बॅगेतून 12 हजार रुपये काढून पळ काढला. कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## दागिने व रोख चोरी

**अमरावती** – गाडगेनगर पोलिस ठाणे हद्दीतील मार्डी रोडवरील जिजाऊ नगर गणोरकर लेआउट येथे राहणाऱ्या संतोष देविदास नांदेडकर (वय 30) यांच्या घरात चोरट्यांनी घरफोडी करून दागिने व रोख मिळून 1 लाख 42 हजारांचा ऐवज चोरून नेला. नांदेडकर यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# निवडणुकांची चाहूल, अडगळीमधील कार्यकर्त्यांनाही आले अच्छे दिन...!

## 10 वेळा कॉल करूनही फोन न घेणारे नेतेही लगेच बोलतात

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट, (दि. 14)** नगर परिषद, निवडणुकीचा बिगूल वाजला असून, निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. आचारसंहिता लागू झाली असून, प्रचारासाठी उमेदवारांना काही मोजकेच दिवस मिळत असल्याने उमेदवारांनी निष्ठावान कार्यकर्त्यांचा शोध घेणे सुरू केले आहे. यामुळे एरव्ही दहा वेळा कॉल करूनही फोन न उचलणारे नेते आता एका बेलमध्येच कार्यकर्त्याचे फोन घेत आहेत. यामुळे कार्यकर्त्यांतूनही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सध्या निवडणुकीच्या चाहूलमुळे अगदी अडगळीत पडलेल्या कार्यकर्त्यांनाही %अच्छे दिन% येत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे .



पक्षात निवडणुका आल्या की प्रत्येक इनकमिंग आणि आउटगोइंगला सुरुवात होते. ज्या कार्यकर्त्यांमागे घरचं मतदानही नाही, असे कार्यकर्तेही अशावेळी पक्ष सोडण्याच्या वल्गना करत असतात. निवडणुकीच्या तोंडावर उगाच पक्षाला खिंडार नको म्हणून नेतेही आपल्या कार्यकर्त्यांना कुरवाळत असतात. त्यामुळे सध्यातरी कार्यकर्ते आपापल्या पक्षात टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान नेत्यांसमोर आहे. त्यामुळे नेत्यांनी कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवला असून, ठिकठिकाणी कॉर्नर बैठकांवरही जोर दिला जात आहे.

### सोशल मीडियाने आणली रंगत

सोशल मीडियावरून या निवडणुकीतील रंगत वाढवली जात आहे. दररोज एका नव्या नेत्याचे नाव कार्यकर्ते चर्चेत आणत आहेत. यामुळे कालपर्यंत निवडणुकीबाबत मनात कुठलाही विचार नसलेले नेतेही अचानक निवडणुकीच्या कामाला लागल्याचे दिसून येत आहे.

# राजेंद्रसिंह सोमवंशी यांचा भाजपा प्रवेश

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि. 14)**– चिखलदरा नगरपरिषद निवडणूक जवळ येत असून संपूर्ण तालुक्यात राजकीय वातावरण तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह विविध पक्षांचे वरिष्ठ नेते या निवडणुकीकडे लक्ष ठेवून आहेत. अशातच आज चिखलदरा येथील माजी नगराध्यक्ष राजेंद्रसिंह सोमवंशी यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष व माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन



स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाला डॉ. अनिल बोंडे, राज्यसभा खासदार प्रवीण पोटे-पाटील, माजी राज्यमंत्री व मेळघाट जिल्हा निवडणूक प्रमुख संजय कुटे, माजी मंत्री व जिल्हा निवडणूक प्रभारी केवलराम काळे, आमदार राजेश वानखडे, आमदार नितीन गुडधे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सोमवंशी यांच्या प्रवेशामुळे चिखलदरा नगरपरिषदेतील भाजपा अधिक बळकट झाली आहे.

**काँग्रेस विरुद्ध भाजपा – चिखलदऱ्यात थेट लढत?**

राजेंद्रसिंह सोमवंशी यांच्या

### निवडणुकीच्या तोंडावर चिखलदऱ्यात राजकीय हलचालींना वेग

प्रवेशामुळे चिखलदरा नगरपालिकेत भाजपा आणि काँग्रेस यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मागील निवडणुकीत काँग्रेसच्या बाजूने असलेले सोमवंशी यंदा भाजपात दाखल झाले असून त्यांच्या समर्थक आणि संभाव्य उमेदवारांनीही भाजपात प्रवेश केला आहे. त्यामुळे चिखलदऱ्याच्या राजकारणाला नवी कलाटणी मिळाल्याचे मानले जात आहे.

# जामगावच्या सरपंचांचा भाजपात प्रवेश



महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि.14)** – जामगाव (खडका) ग्रामपंचायतीतील राजकारणात मोठा उलथापालथ घडवणारी घटना रविवारी घडली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त करत ग्रामपंचायत सरपंच लीलाबाई कुमरे आणि सदस्य संजय युवनाते यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

**राष्ट्रवादी नेतृत्वाला मोठा धक्का**

वरुड येथील अष्टविनायक सभागृहात झालेल्या भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार उमेश यावलकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, श्रीधर सोलव, प्रभाकर काळे आणि विक्रम ठाकरे हेही उपस्थित होते. लीलाबाई कुमरे यांनी सांगितले की, विकासाच्या कामांना गती देण्यासाठी आणि गावाच्या प्रगतीसाठी हा निर्णय घेतला आहे.

त्यांच्या या निर्णयामुळे जामगाव (खडका) येथील राजकीय समीकरणात मोठा बदल होणार असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाला मोठा धक्का बसल्याची चर्चा आहे.

या प्रवेशामुळे भाजपाचा स्थानिक आधारवर्ग अधिक मजबूत झाला आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांवर या घडामोडींचा ठोस परिणाम दिसणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# अवैध गोवंश तस्करी करणारा ट्रक जप्त

## मोर्शी पोलिसांची धडाकेबाज कारवाई | सहा म्हशींची निर्दयी कोंडी उघड

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी (दि. 14) :** मोर्शी–चांदूरबाजार रोडवर नाकाबंदी करून पोलिसांनी अवैध जनावर तस्करी करणारा ट्रक क्रमांक एमएच 29 एम 1226 ताब्यात घेतला. या वाहनात मध्यप्रदेश येथून अवैधरित्या आणण्यात आलेल्या म्हशी जातीच्या सहा जनावरांना अतिशय क्रूरपणे कोंबून नेण्यात येत होत्या.

गोवंशांची वाहतुक होत असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पोलिसांना मिळाली होती. मोर्शीङ्कचांदूरबाजार रोडवर अवैधरित्या जनावरे वाहतूक करणाऱ्यांच्या मुसक्या आवळत मोर्शी पोलिसांनी मोठी कारवाई केली. सहा जनावरांची सुटका करत तब्बल 6 लाख 76 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शुक्रवार (दि. 14) रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण व अथर्व कोहळे यांनी चांदूरबाजार रोडवर नाकाबंदी केली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये सहा म्हशी निर्दयीपणे कोंबून नेण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत सहा म्हशी (किंमत 1 लाख 26 हजार), ट्रक (किंमत 5 लाख 50 हजार) असा एकूण 6 लाख 76 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेली जनावरे पिंपळखुटा येथील गौरक्षण केंद्रात चारापाण्यासाठी ठेवण्यात आली आहेत. वाहनचालकासह संबंधित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेत असून जनावरांना निर्दयतेने कोंबून वाहतूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत (अमरावती ग्रामीण), उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, तर मोर्शी ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वात पीएसआय तुषार चव्हाण व अथर्व कोहळे यांनी केली.

## दुचाकीच्या धडकेत महिला जखमी

**अमरावती** – सोमवारी कामानिमित्त महिला दुचाकीने जात होती. त्याच वेळी चपराशीपुरा ते सुंदरलाल चौकातून यू-टर्न घेत असताना मागून भरधाव दुचाकीने धडक दिली. त्यात महिला दुचाकीसह रसत्यावर पडली. तिच्या दोन्ही पायांना मार लागला. तर दुचाकीचे सुमारे 6 हजारांचे नुकसान झाले. महिलेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी यश तायडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

# मोर्शीतील विद्यार्थ्यांचे अबॅकस स्पर्धेत उत्तुंग यश!

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 14)** – एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीतर्फे आयोजित 45 व्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनचे अमरावतीतील देशमुख लॉन येथे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत मोर्शी येथील जयश्री देशभ्रतार यांच्या क्लासमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून मोर्शीचे नाव उज्ज्वल केले. अवघ्या पाच मिनिटांच्या या स्पर्धेत विविध लेव्हलमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय वेग आणि अचूकता दाखवली. प्रशिका देशभ्रतार हिने तीन अंकीला एक अंकी भागाकाराची 163 गणिते पाच मिनिटांत सोडवून चॅम्पियनशिप मिळवली. सेजल गेडाम हिने दोन अंकीला एक अंकी गुणाकाराची 121 गणिते तर आरव बानेकरने बेरीज-वजाबाकीची 81 गणिते सोडवत चॅम्पियनशिप पटकावली.



अनाया तभाने, कनिष्क चक्रनारायण, अर्श गावंडे, अदविका हराळे, महती गेडाम, ज्ञानदा गेडाम, ओवी गाडे, यशश्री खरबडे, रुही चौधरी, अनुराग चव्हान, तमन्ना ठाकरे, विनीत हरले आणि अथर्व मानकर यांनी टॉप 10 मध्ये स्थान मिळवले. तर ओजस्वी माटकर, सक्षम टिक्कस, सारसी डाफे, प्रिशा उन्होने, नेत्रा धोटे, आराध्या राऊत, अर्णव वानखडे, वेदिका आठवले, प्रयास ठाकरे, श्रुती गतफने आणि पूर्वजा धोटे यांनी एक्सलंट ट्रॉफी मिळवली. स्वामी मेहंत, अंश वाघाडे, प्रियल मोहोड, सिद्धांत गजभिये, वंशिका हगवणे, मनस्वी ठोंबरे आणि लावण्य देशभ्रतार यांनी बेस्ट ट्रॉफी पटकावली. अबॅकसच्या शिक्षणामुळे मुलांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती, आकलनशक्ती, आत्मविश्वास आणि गणिती वेगात लक्षणीय वाढ होत असल्याचे मार्गदर्शकांनी सांगितले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला मोठी चालना मिळते.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत नगराध्यक्षपदासाठी सर्व पक्षांत रस्सीखेच

## एकाही राष्ट्रीय पक्षाचा उमेदवार अद्याप जाहीर नाही

## नेते-पदाधिकाऱ्यांमध्ये प्रखर विरोध

**प्रविण बोके**

**अंजनगाव सुर्जी, (दि. 14)** – नगरपरिषद निवडणुकीच्या उमेदवारी अर्जासाठी अवघे दोनच दिवस बाकी असताना अजूनही कोणत्याही पक्षाने नगराध्यक्ष किंवा नगरसेवक पदाचे उमेदवार जाहीर केलेले नाहीत. यामुळे इच्छुकांमध्ये नेतृत्व कोणाचे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक संभाव्य उमेदवार पक्षासोबतच स्वतंत्र (अपक्ष) अर्जही दाखल करण्याचा विचार करत असल्याचे चित्र आहे.




शनिवार आणि सोमवार हे अर्ज दाखल करण्याचे शेवटचे दोन दिवस उरले असतानाही एकाही राष्ट्रीय पक्षाने उमेदवार जाहीर न केल्याने शहरात चर्चांना उधाण आले आहे. भाजप आणि शिवसेना (उबाठा) या दोन्ही पक्षांत उमेदवार निश्चितीवरून मोठी रस्सीखेच असून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नेत्यांमध्ये मतैक्य साधले गेलेले नाही. विरोधकाचा उमेदवार जाहीर झाल्यावरच निर्णय घ्यावा, अशा भूमिकेत दोन्ही पक्ष असल्याचीही चर्चा आहे.

शिवसेना (उबाठा) कडून आमदार गजानन लवटे यांचे सुपुत्र यश लवटे यांची उमेदवारी निश्चित असल्याचे चित्र निर्माण झाले होते; मात्र त्यांच्या नावालाही अंतर्गत विरोध असल्याची कुजबुज आहे. त्यामुळे आमदार लवटे हे पदाधिकाऱ्यांच्या मताला प्राधान्य देणार की पुत्रप्रेमाला, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे, विजय नक्की असल्याचा दावा करणाऱ्या भाजपनेही अद्याप उमेदवार जाहीर केला नाही. काही नेत्यांच्या हट्टामुळे निरीक्षकांनी पक्षपदाधिकाऱ्यांना वाळीत टाकल्याचा आरोप होत असून, स्थानिक पदाधिकारी गुपचूप बंडाची तयारी करत असल्याची माहिती मिळते. काँग्रेसमध्ये मात्र अजूनही कोणतीही हालचाल दिसत नाही. पक्षाचे पदाधिकारी केवळ विशिष्ट मतदारवर्गाभोवती फिरत असून, आधी उमेदवारी निश्चित करा, बाकी नंतर पाहू अशी स्थिती आहे. बी-फॉर्म कोणाला आणि केव्हा मिळणार, याचीही स्पष्टता नाही. त्यामुळे आज एका पक्षात असलेला पदाधिकारी उद्या दुसऱ्या पक्षाकडून उमेदवारी घेताना दिसला, तरी आश्चर्य वाटणार नाही, अशी परिस्थिती आहे. जातीय आणि धार्मिक समीकरणेच निवडणुकीवर हावी राहणार असून विकास हा मुद्दा बाजूला पडण्याची शक्यता आहे.

### एमआयएमकडून मोठी घोषणा अपेक्षित

शहरात मुस्लिम मतदारांची संख्या निर्णायक असल्याने एमआयएम उमेदवारी जाहीर करताना मोठा गुप्त स्फोट करणार, अशी चर्चाही जोरात आहे.

राज्यात प्रभाव असलेल्या राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या दोन्ही पक्षांची अंजनगाव सुर्जीच्या निवडणुकीत विशेष चर्चा नसली, तरी इतर पक्षांमध्ये दुर्लक्षित झालेल्या उमेदवारांना आश्रय देणारे पर्याय म्हणून त्यांच्याकडे पाहिले

## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत मोहम्मद तौसीफ रजा अब्दुल जब्बार रा. कलमखार ता. धारणी यांचा जन्म दिनांक 05/11/1997 रोजी गाव कलमखार ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत कलमखार ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**मोहम्मद तौसीफ रजा अब्दुल जब्बार**

**Change in Name**

Old name Harshad Madhukarrao Deshmukh (as per educational document)

New name Harshad Madhukar Deshmukh (As per Aadhar and PAN Card)

Address:- plot no. 107 Amar Colony Nandurbar 415412 Mob no 9923102237

RNINO-46975/1985

Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५

महासागर अमरावती

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**

# बिरसा मुंडा : भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील दीपस्तंभ

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत ज्यांचे योगदान केवळ संघर्षापुरते मर्यादित नसून त्यांनी एका समाजाला, एका संस्कृतीला आणि एका युगाला नवसंजीवनी दिली. त्यात धरती आबा म्हणून ओळखले जाणारे महान क्रांतिकारक, सामाजिक सुधारक व जननायक बिरसा मुंडा हे नाव आदराने उच्चारले जाते. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील छोटानागपूर पठारातील उलिहातू या छोट्याशा गावात जन्मलेल्या या महान योद्ध्याने केवळ आदिवासींच्या अधिकारांसाठी लढा दिला नाही, तर भारतदेशाच्या स्वातंत्र्यलढ्यातही आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यंदा आपण त्यांच्या १५०व्या जयंतीचा उत्सव साजरा करीत आहोत. हा केवळ स्मरणाचा क्षण नाही, तर त्यांचा आदर्श, विचार आणि लढ्याच्या परंपरेचा पुनर्जागरण करण्याचा अवसर आहे.

बिरसा मुंडा हे ज्या काळात जन्मले, तो काळ भारतावर ब्रिटिशांच्या वर्चस्वाचा होता. ब्रिटिशांनी देशातील जनतेला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या जखडून ठेवले होते. विशेषतः झारखंड, ओडिशा, बिहार या भागातील आदिवासी समाजावर ब्रिटिश शासन, जमींनदार आणि महाजन त्रिकूटाने अत्याचाराचा डोंगर कोसळवला होता. त्यांच्या जमिनी हिसकावल्या जात होत्या, पिढ्यानपिढ्या शेती करून उपजीविका करणारे हे लोक बेघर होत होते, आणि त्यांना गुलामगिरीच्या गर्तेत ढकलले जात होते. अशा अंधकारमय परिस्थितीत या समाजाच्या हृदयातून एक ज्वाला पेटली होती आणि ती ज्वाला होती बिरसा मुंडांची. बालपणापासूनच बिरसांना अन्यायाविरुद्ध तीव्र असंतोष होता. त्यांनी आपल्या आजूबाजूच्या समाजात शोषण, दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा आणि धार्मिक फसवणूक पाहिली होती. ब्रिटिश राजवटीत आदिवासींची जमीन सरकारी मालकीची घोषित करून, ती गैरआदिवासी जमीनदार व व्यापाऱ्यांना देण्यात आली होती. या अन्यायाविरुद्ध बिरसांनी आपल्या लोकांना एकत्र केले आणि एक नवे सामाजिक व राजकीय आंदोलन उभारले त्यालाच उलगुलान म्हणजेच महान बंड म्हटले जाते. हे बंड केवळ ब्रिटिशांविरुद्ध नव्हते, तर संपूर्ण अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध होते.

बिरसा मुंडा यांनी आपल्या विचारांद्वारे आदिवासी समाजात जागृती निर्माण केली. त्यांनी सांगितले की आपली जमीन, आपले जंगल आणि आपले पाणी हेच आपले जीवन आहे. त्यांनी आदिवासींना गुलामीच्या बेड्यातून मुक्त करण्यासाठी शिक्षण, आत्मनिर्भरता आणि संघटनेचे महत्त्व पटवून दिले. धरती आबा म्हणून लोक त्यांना मानू लागले, कारण त्यांनी आपल्या मातृभूमीला माता समजले आणि तिचे रक्षण करणे हेच आपला धर्म मानले. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने आपला स्वतंत्र धर्म, संस्कृती आणि ओळख टिकवून ठेवण्यासाठी एक व्यापक चळवळ उभारली होती.

१८९९ मध्ये बिरसा मुंडांनी छोटानागपूर प्रदेशात मुंडा आंदोलन उभारले. या आंदोलनाचे घोषवाक्य होते अबुआ दिशुम, अबुआ राज म्हणजे आपली जमीन, आपले राज्य. त्यांनी आपल्या अनुयायांना हिंसाचारापेक्षा आत्मसन्मानाची लढाई लढण्यास प्रेरित केले. ब्रिटिश सरकारच्या शोषणकारी भूमिसुधार कायद्यांविरोधात त्यांनी जमिनींचे रक्षण करण्यासाठी जनतेला संघटित केले. या बंडाने ब्रिटिश सरकार हादरून गेले. बिरसा मुंडा हे केवळ स्थानिक नायक राहिले नाहीत, तर ते भारतातील पहिल्या स्वातंत्र्यवीरांच्या श्रेणीत स्थान मिळवून गेले.

बिरसांच्या विचारसरणीत समाजसुधारणेचे तत्त्वही स्पष्ट दिसते. त्यांनी आपल्या समाजातील अंधश्रद्धा, मद्यपान, जादूटोणा आणि भोंदूपणाविरुद्ध तीव्र आवाज उठवला. त्यांना वाटत होते की जोपर्यंत आदिवासी समाज स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणत नाही, तोपर्यंत बाहेरील अत्याचाराला तोंड देता येणार नाही. म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना संयम, सत्य आणि परिश्रमाचे शिक्षण दिले. त्यांनी आदिवासी धर्माला एका नैतिक चौकटीत बांधून सामाजिक एकता प्रस्थापित केली.



डॉ. राजेंद्र बगाटे
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

त्यांचे विचार फक्त समाजपरिवर्तनापुरते मर्यादित नव्हते तर त्यात स्वातंत्र्याचा गाभा होता. त्यांनी सांगितले की इंग्रज सरकार ही आपल्या भूमीवरील परकी सत्ता आहे आणि तिचे उच्चाटन हे आपले परम कर्तव्य आहे. या विचारांनी पुढील स्वातंत्र्यसंग्रामातील अनेक नेत्यांना प्रेरणा दिली. गांधीजींच्या सत्याग्रह आणि स्वावलंबन या तत्त्वांपूर्वीच बिरसा मुंडांनी स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा संदेश आपल्या लोकांना दिला होता.

१८९५ मध्ये ब्रिटिशांनी त्यांना अटक करून तुरुंगात डांबले, परंतु त्यांची क्रांतीची ज्योत विझली नाही. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी पुन्हा आपल्या अनुयायांना संघटित केले. मात्र, ब्रिटिश सरकारला त्यांचा प्रभाव सहन झाला नाही. १९०० मध्ये त्यांना पुन्हा अटक करण्यात आली आणि ९ जून १९०० रोजी रांचीच्या तुरुंगात त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला. तेव्हा त्यांचे वय फक्त २५ वर्षांचे होते. पण या तरुण क्रांतिकारकाने अल्पायुष्यात केलेले कार्य भारतीय इतिहासात अमर झाले.

बिरसा मुंडा यांच्या बलिदानाने आदिवासी समाजात नवचेतना निर्माण झाली. ब्रिटिश सरकारला अखेर छोटानागपूर टेनन्सी ॲक्ट मंजूर करावा लागला, ज्यामुळे आदिवासींच्या जमिनींचे संरक्षण झाले. हा कायदा आजही त्यांच्या लढ्याचे फलस्वरूप म्हणून ओळखला जातो. त्यांच्या आंदोलनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवा सामाजिक पाया दिला गेला. स्वराज्य हा केवळ राजकीय संकल्प नाही, तर तो सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीचाही मार्ग आहे, हे बिरसांनी दाखवून दिले.

आज बिरसा मुंडा हे केवळ एका आदिवासी समाजाचे नायक राहिलेले नाहीत; ते भारताच्या सामाजिक न्यायाच्या, समतेच्या आणि स्वाभिमानाच्या चळवळीचे प्रतीक झाले आहेत. १५ नोव्हेंबर हा दिवस आज जनजातीय गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ आदरांजली देण्याचा नाही, तर त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा आहे. त्यांनी शिकवलेली एकता, परिश्रम, आणि स्वाभिमानाची शिकवण आजही भारताला नवी दिशा देते. त्यांचा लढा केवळ ब्रिटिशांविरुद्ध नव्हता, तर शतकानुशतके चालत आलेल्या शोषणाच्या व्यवस्थेविरुद्ध होता. त्यांनी समाजातील दुर्लक्षित वर्गांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. आज जेव्हा आपण सबका साथ, सबका विकास याची चर्चा करतो, तेव्हा बिरसा मुंडांचे विचार त्यामागे जिवंतपणे उभे दिसतात. त्यांच्या जीवनातून आपल्याला समजते की सामाजिक न्याय आणि स्वातंत्र्य हे हातात हात घालून चालतात.

भारतीय लोकशाहीचा आत्मा म्हणजे समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता होय. बिरसा मुंडा यांनी या तीनही मूल्यांचे बीज आपल्या संघर्षातून रोवले. त्यांच्या प्रेरणेने आज अनेक आदिवासी तरुण शिक्षण, रोजगार आणि राजकारणाच्या क्षेत्रात पुढे येत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, स्मारके उभारली आहेत. पण खरी आदरांजली तीच, जेव्हा आपण त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरवू, शोषणमुक्त समाज, पर्यावरणसंवर्धन, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची दिशा स्वीकारू.

आजच्या काळात, जेव्हा जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी समाज पुन्हा आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हानांना सामोरे जात आहे, तेव्हा बिरसा मुंडांचा संदेश पुन्हा नव्याने स्मरणात आणण्याची गरज आहे. त्यांनी सांगितले होते की धरती ही आई आहे, तिचे रक्षण हेच आपला धर्म आहे. हा विचार आज पर्यावरणीय संकटांच्या काळात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यांनी दाखवून दिले की खरी प्रगती तीच, जी निसर्गाशी सुसंवाद राखते.

बिरसा मुंडा यांचे जीवन म्हणजे क्रांती, अध्यात्म आणि सामाजिक न्याय यांचा त्रिवेणी संगम होते. त्यांचा संघर्ष हे दाखवतो की एका तरुणाच्या धैर्याने संपूर्ण व्यवस्था हादरवता येते, जर त्याच्या मनात जनतेसाठी प्रेम आणि न्यायाची ज्वाला असेल तर.



वनवासी हुतात्मा बिरसा मुण्डा

त्यांनी आपल्या अल्पायुष्यात जे कार्य केले, ते आजही भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे.

अखेर, बिरसा मुंडा हे केवळ एक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नाहीत, तर ते भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहातील जिवंत प्रतीक आहेत. त्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आपण त्यांना केवळ स्मरणात ठेवू नये, तर त्यांच्या आदर्शांनुसार वर्तन करावे. कारण बिरसा मुंडा म्हणजे स्वाभिमानाची मूर्ती, अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक आणि भारताच्या आत्म्याचा निखळ दीपस्तंभ होते. त्यांचा विचार भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सदैव दीपस्तंभासारखा उजळत राहील. देशासाठी, समाजासाठी, आणि प्रत्येक त्या माणसासाठी जो न्याय आणि समानतेसाठी झगडत आहे.

# जननायक बिरसा मुंडा

आज १५ नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# दिल्लीतील दहशतवादी हल्ला देशासाठी मोठा धक्का!

१० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात एका कारमध्ये झालेला स्फोट दहशतवादी घटना असल्याचे सिध्द झाले आहे. दिल्लीतील बॉम्ब स्फोटानंतर तपास यंत्रणांनी अनेक संशयास्पद स्थळ आपल्या नियंत्रणात घेतले आहेत. त्यामध्ये अल-फलाह विद्यापीठाचा समावेश आहे. दिल्लीतील बॉम्बस्फोट आणि व्हाईट कॉलर्डमॉड्युलचा पर्दाफाश झाल्यानंतर हरयाणाच्या फरिदाबाद जिल्ह्यातील मुस्लिमबहुल धौज गावातील अर-फलाह विद्यापीठ आणि त्याचा ७६ एकरचा विस्तीर्ण परिसर संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. जैश-ए-मोहम्मदने डॉक्टर पेशाच्या माध्यमातून घृणास्पद बॉम्ब हल्ला केला ही देशासह जगासाठी अत्यंत धक्कादायक घटना आहे. डॉक्टर पेशाला दैवी शक्ती मानल्या जाते. परंतु दिल्ली बॉम्ब ब्लास्टनंतर डॉक्टर पेशाला आतंकवाद्यांनी कलंकित केले आहे. त्यांना आता जशास तसे उत्तर देण्याची नितांत गरज आहे. कारण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या आतंकवादी हल्ल्याला अंजाम देण्यासाठी संपूर्ण आतंकवादी डॉक्टर पेशातून आपापली रुपरेशा आणि गाईडलाईन ठरवित होते. त्याचप्रमाणे यांचे मनसुबे अत्यंत घातक व भयावह होते कारण हे हल्ले मुंबई बॉम्बस्फोटाच्या धर्तीवर असल्याचा कट तपास यंत्रणेकडुन लक्षात येते. देशातील मोठ्या शहरांमध्ये २०० हुन अधिक धमाके करण्याच्या तयारीत ही आतंकवादी संघटना होती. यामध्ये राजधानीतील इंडिया गेट, कॉन्स्टिट्युशन क्लब, गौरीशंकर मंदिर, रेल्वे स्थानके, दिल्लीतील मॉल, तसेच गुरूग्राम आणि फरिदाबाद येथेही त्यांना घातपात घडवून आणायचा प्लॅन होता अशी माहिती तपासातून समोर आली आहे. दिल्लीतील हल्ले घडवून आणण्याचे कारस्थान पाकिस्तानमधील जैश-ए-मोहम्मद ही संघटना जानेवारी पासून कट रचत होती हेही उघडकीस आले आहे. त्याचप्रमाणे दिल्लीतील धमाका मोठ्या जमावाच्या ठिकाणी करण्याचा विचार होता. परंतु ट्राफीक सिग्नलवर तीन तास आतंकवाद्यांची गाडी थांबल्याने मोठा अनर्थ टळल्याचे सांगितले जाते. तरीही दिल्लीतील बॉम्ब ब्लास्ट हा भयावह असल्याचे दिसून आले. यावरून स्पष्ट होते की आतंकवाद्यांना जात धर्म, पंथ, पेशा, मानुस्की, डॉक्टर, आबालवृद्ध यांच्याशी काहीही देणेघेणे नसतेच त्यांना फक्त दहशत निर्माण करून भितीचे वातावरण निर्माण करणे हाच एकमेव उद्देश असतो हे स्पष्ट होते आणि या हल्ल्याचा सुत्रधार जैश – ए-मोहम्मदच आहे यात दुमत नाही. परंतु यात पाकिस्तान व तेथील संपुर्ण आतंकवादी संघटना यात सहभागी असल्याचे दिसून येते. देशात आतंकवाद्यांनी अनेक हल्ले केलेत परंतु दिल्लीतील बॉम्ब ब्लास्टमध्ये आतंकवाद्यांनी जी टेकनीक आणि टेक्नॉलॉजी वापरली ती अत्यंत घृणास्पद म्हणावी लागेल. कारण जगातील महान आणि जीवनदान देणारा पेशा हा डॉक्टर असतो. परंतु



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

आतंकवाद्यांच्या कारवाईचे अनेक प्लॅन फेल होत आहे असे त्यांच्या मास्टरमाईंड व आकांना वाटु लागेल अशा परिस्थितीत आतंकवाद्यांनी दहशत निर्माण करण्यासाठी डॉक्टरी पेशेचा वापर करून दिल्लीमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणला व यात १३ निरअपराधांचा बळी गेला आणि अनेक जण गंभीररित्या जखमी झालेत. भारतीय सेनेने आतंकवाद्यांची संपूर्णपणे कंबर मोडली आहे आणि मोडत आहे. त्यामुळे आतंकवादी आगबबुला झाले असावे. त्यामुळे डॉक्टरी पेशाचा वापर आतंकवादी हल्ल्यासाठी कसा करता येईल यासाठी गेल्या एक वर्षापासून जैश-ए-मोहम्मदचे आतंकवादी प्रयत्न करीत होते आणि त्याच प्रयत्नातुन आतंकवाद्यांनी दिल्ली बॉम्ब ब्लास्ट घडवून आणला ही बाब स्पष्ट होते. दिल्ली बॉम्ब स्फोटात तुर्की कनेक्शन उघडकीस आले आहे. यावरून स्पष्ट होते की या हल्ल्यात फक्त तुर्की किंवा पाकिस्तान नसुन आंतरराष्ट्रीय आतंकवादी संघटना या हल्ल्यात सहभागी असावे असे मला वाटते. कारण भारताची प्रगती अनेक देशांना खुपत असावी त्यामुळे भारत विरोधी देश अशाप्रकारच्या आतंकवादी कारवायांना मदत करीत असावेत. लाल किल्ल्याजवळ झालेला भयंकर स्फोट हा केवळ अपघात नव्हता तर ६ डिसेंबरला मोठा दहशतवादी हल्ला करण्याचे नियोजन आतंकवादी संघटनेचे होते ही बाब सुध्दा उघडकीस आली आहे. अधिकाऱ्याच्या मते फरीदाबाद मॉड्यूल वेळेवर उघडकीस आले नसते, तर ६ डिसेंबरला दिल्लीला हादरवणारा स्फोट झाला असता असेही सरकारी सुत्रांकडून समजते, म्हणजेच आतंकवाद्यांचे मनसुबे भयानक होते. परंतु देशाच्या सुरक्षा एजन्सीने अनेक ठिकाणी धाडी टाकून मोठ्या प्रमाणात विस्फोटक पकडले व आतंकवाद्यांचे पुढील नियोजन निष्फळ केले. दिल्ली बॉम्ब स्फोटाची अनेक देशांनी निंदा केली. परंतु पाकिस्तान म्हणतो की, दिल्लीतील बॉम्ब ब्लास्ट हा सिलेंडरमुळे झालेला स्फोट आहे. यावरून स्पष्ट होते की, पाकिस्तानची शेपुट वाकड ते वाकडच! दिल्लीतील बॉम्ब स्फोटावरून स्पष्ट होते की भारतातील काही संघटनांचे तार पाकिस्तान, तुर्कीसह आंतरराष्ट्रीय आतंकवाद्यांशी जुळले असावेत. देशातील जनतेनी आतंकवाद्यांचा नायनाट करण्यासाठी सरकारला व सुरक्षा विभागाला सर्वोतोपरी मदत करावी. सरकार व सुरक्षा विभाग आपापल्या पद्धतीने कार्य करीत आहे तरीही जनतेचे सहकार्य आवश्यक असते. १० नोव्हेंबर २०२५ देशासाठी काळा दिवस ठरला या आतंकवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या प्रती शोक संवेदना प्रगट करतो व जखमी झालेले नागरिक ताबडतोब दुरुस्त व्हावे अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. जय हिंद!



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

# असुरक्षित राजधानी

सोमवारी, दहा नोव्हेंबर, २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजून ५२ मिनिटांनी राजधानी दिल्लीत लाल किल्ला परिसरात आय २० या महागड्या कारमधे भीषण स्फोट होऊन १२ जण ठार झाले व तीसपेक्षा जास्त जखमी झाले, या घटनेने सारा देश हादरला. लाल किल्ला परिसरात एकाच जागी तीन तासाहून अधिक वेळ पार्किंगमधे थांबलेली कार मेट्रो रेल्वे स्टेशनच्या दिशेने हळू हळू निघाली आणि सिग्नलला थांबली असताना प्रचंड आवाज होऊन मोठा स्फोट झाला. आगीचे उंच लोळ पसरले. आजुबाजुची वीस-पंचवीस वाहने, मोटारी व रिक्षा आगीत भस्मसात झाल्या. या स्फोटाने किमान बारा बळी घेतले व तीसपेक्षा जास्त जखमी झाले. लाल किल्ला मेट्रो स्टेशन बाहेर रक्ताचे सडे पडले. स्फोट एवढा भयानक होता की, ठार झालेल्या मृतदेहांचे हात, पाय, डोकी, आदी अवयव चौफेर फेकले गेले. नंतर हे अवयव गोळा करून मृतदेह पोस्टमार्टेमसाठी इस्पितळात नेण्यात आले.

दिल्लीतील भीषण स्फोटानंतर मुंबईसह देशातील सर्व मोठ्या शहरात व गर्दीच्या व मंदिरांच्या ठिकाणी रेड अलर्ट जारी करण्यात आला. मुंबईतील सिध्दीविनायक मंदिर, शिर्डीतील साई मंदिर, तुळजापूर येथील तुळजाभवानीमाता मंदिर आदी ठिकाणी आलेल्या भक्तांची कडक सुरक्षा तपासणी करण्यात आली. देशातील विमानतळांवरही सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीतील स्फोटांतील दोषींना सोडणार नाही असा सज्जड दमही दिला. पण सर्वात हाय सिक्युरिटी झोन असलेल्या देशाच्या राजधानीत असा स्फोट कसा घडवला जाऊ शकतो... मागे संसदेचे अधिवेशन चालू असताना दोन तरूण प्रेक्षक गॅलरीत असेच घुसले होते व त्यांनी घोषणा देऊन सभागृहात उड्या मारल्या होत्या. दिल्लीची सुरक्षा व्यवस्था ही केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत येते. लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ भीषण स्फोट झाल्यानंतर दिल्ली पोलीसांची मोठी कुमक तेथे गेलीच पण एनआयए ( नॅशनल इन्व्हेस्टिगेटिव्ह एजन्सी ) सह अनेक तपास यंत्रणा घटनास्थळी धावत गेल्या. एतिहासिक लाल किल्ला हा तर देशाचे प्रतिक म्हणून जगभर ओळखले जातो. लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाला देशाचे पंतप्रधान देशाला उद्देशून भाषण करीत असतात. मग अशा संवेदनशील परिसरात एका कारमधे मोठा स्फोट होतो व त्यात डझनभर लोकांचे बळी पडतात, याचा सुगावा दिल्ली पोलिसांना किंवा गुप्तचर यंत्रणांना किंचितही कसा लागत नाही याचेच आश्चर्य वाटते. हा दहशतवादी हल्ला होता की आत्मघातकी पथकाने स्फोट घडवला याचा पहिले दोन दिवस उलटले तरी खुलासा झाला नव्हता. लाल किल्ला परिसरात मोटारीत प्रचंड स्फोट घडविण्यामागे हल्लेखोरांचा हेतू काय होता हे स्पष्ट झाले नाही. या घटनेमागे जो मास्टर माईंड होता तो डॉक्टर उमर हा स्वतः आय २० ही मोटार चालवित होता का ..याच स्फोटात त्याचा मृत्यु झाला असे पुढे आले आहे. मास्टर माईंडच स्वतः स्फोट घडवून स्वतःच्या शरीराच्या चिंधड्या करून घेत असेल तर त्यामागे कोणते मोठे कारण असू शकते... या घटनेमागे काहीतरी मोठे गूढ असू शकते. स्फोटात जे ठार झाले त्यात मोठा नेता किंवा सेलेब्रेटी नव्हता. मग असा दहशतवादी स्फोट घडविण्यामागे त्यांचे टार्गेट काय होते.. ज्या ठिकाणी मोटारीत स्फोट झाला, त्या ठिकाणी चार सीसीटीव्ही आहेत. त्यांच्या फुटेजची कसून तपासणी चालू आहे. फॉरेनसिक लॅब, एटीएस आणि एनएसडीची टीमही बारकाईने तपासणी करीत आहे. उत्तर प्रदेश पोलिसांची एटीएस टीमही दिल्लीत दाखल झाली आहे. स्फोटाचा आवाज एवढा मोठा होता की, बाजुच्या दुकानातील वयस्कर लोक खाली पडले, आजुबाजुच्या इमारतींनाही हादरे बसले. लाल किल्ला परिसरात पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. मेट्रोमुळे हजारो प्रवाशांची सतत ये- जा असते. या परिसरात अगदी पूर्वीपासून मुस्लिम लोकसंख्या मोठी आहे. अशा संवेदनशील ठिकाणी सुरक्षा यंत्रणेचे दुर्लक्ष झाले की असे काही होऊ शकते याचा थांगपत्ताच कुणाला लागला नाही... देशाच्या राजधानीत नेहमीच सुरक्षा व्यवस्था कडक असते, नेहमीच हाय अलर्ट असतो. देश - विदेशातील अतिमहत्वाच्या व्यक्तींची दिल्लीत सतत ये-जा असते. राष्ट्रपती भवन, पंतप्रधानांचे कार्यालय, साऊथ ब्लॉक व नॉर्थ ब्लॉक, सर्वोच्च न्यायालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, केंद्र सरकारची मुख्यालये, सर्व राजकीय पक्षांची व आर्थिक व व्यापार क्षेत्रातील उद्योग समुहांची मुख्यालये किंवा प्रधान कार्यालये, विविध देशांचे दूतावास देशाच्या राजधानीत आहेत. राजधानीतील सुरक्षा यंत्रणा नेहमीच सज्ज असली पाहिजे. सुरक्षा यंत्रणेकडे अत्याधुनिक व अद्ययावत शस्त्रास्त्रे हाती असतात. मग दहा नोव्हेंबरची स्फोटाची घटना घडली तेव्हा सुरक्षा यंत्रणा कमी पडली की गुप्तचर यंत्रणा अपयशी ठरली... नवी दिल्लीतील रस्त्यावरून कोणी व्हीआयपी नेता जाणार असेल तर पोलीस काही वेळ त्या रस्त्यावरील वाहतूक पूर्ण बंद करतात, मग सामान्य लोकांच्या सुरक्षिततेसाठी याच यंत्रणा किमान दक्षता का घेत नाहीत...

बिहारच विधानसभेची यंदाची निवडणूक भाजपाने प्रतिष्ठेची केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दिड दोन डझन तरी प्रचार सभा झाल्या. रेड शो झाले. भाजपाचे अनेक केंद्रीयमंत्री व राज्यांचे मुख्यमंत्री बिहारच्या मैदानात प्रचाराला उतरले होते. मतदानाच्या दुसऱ्या व अंतिम टप्प्याच्या नेमके आदल्या दिवशी दिल्लीत संवेनशील विभागात मोठ्या स्फोटाची घटना घडते व मोठा रक्तपात होतो, हा काय योगायोग म्हणायचा का ..हाच दिवस व हीच वेळ स्फोटासाठी मास्टर माईंडने कशी निवडली...

दिल्लीत स्फोट घडण्यापुर्वी काही तास अगोदर जम्मू काश्मीर पोलिसांनी फरिदाबाद (हरयाणा) येथे संशयित दहशतवाद्यांवर कारवाई केली होती. चार डॉक्टरांसह आठ जणांना अटक केली होती. पोलिसांनी तेथे २९०० किलो विस्फोटक जप्त केले, एके ४७ रायफल्स ताब्यात घेतल्या. याचा अर्थ देशात फार मोठा धमाका करण्याचे कारस्थान योजले जात होते. पोलिसांच्या या कारवाईमुळे दहशतवादी व त्यांना पाठबळ देणारे बिथरले असावेत. फरिदाबादमधे बॉम्ब तयार करण्याची फॅक्टरी सापडली हे आणखी भयंकर आहे. दिल्लीत स्फोट घडवून कशाचा बदला घ्यायचा होता हे अजून उघड झालेले नाही. ऑपरेशन सिंदुरचा बदला घेण्यासाठी स्फोट घडवला का... पुलवामामधे सुरक्षा दलावर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानमधे घुसून भारतीय सैन्याने बदला घेतला होता, त्याचा विसर दहशतवाद्यांना अजून पडलेला नाही का... फरिदाबादच्या अल फलाह विद्यापीठातून डॉ. शहिन शहीदला पोलिसांना अटक केली आहे. जैशच्या भारतातील महिला विंगची ती प्रमुख होती. म्हणूनच दिल्ली स्फोटाचे धागेदोरे जैश ए मोहमंद या दहशतवादी संघटनेपर्यंत पोचत आहेत.

लाल किल्ला मेट्रो स्टेशन समोरील मोटारीतील स्फोट हा दहशतवादी हल्ला होता की हा अपघात होता... मोटारीतील सीएनजीचा स्फोट झाला.. हा स्फोट नेमका कशामुळे झाला... स्फोट होणार याची कारमधे बसलेल्या लोकांना कल्पना होती का... ही कार एका मालकाने दुसऱ्याला विकल्यानंतर आरटीओमधे कागदोपत्री मालकाचे नाव का बदलले गेले नाही... या कारचा नंबर हरयाणा राज्यातील असला ती कार कुठून आली व कुठे जात होती... या प्रश्नांची उत्तरे अजून मिळालेली नाहीत. स्फोट घडविण्यामागे दहशतवादी, आत्मघातकी की मानवी बॉम्ब ... नेमके कोण आहे...

# हरवत चाललेल्या बालपणातील 'बालदिन'

'लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।। ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।। ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।।' या एका अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले कि त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले, तरी आजमितीला लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ साजरा होणारा बालदिन देशभरातील शाळांमध्ये नुकताच उत्साहाने साजरा झाला. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला, तरी आजच्या लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे लक्षात येते. विज्ञानाने जग प्रगतशील झाले असे म्हणतात; मात्र याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही यांसारख्या साधनांनी मुलांना वेगळ्याच जगात नेले. मित्र मैत्रिणींसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. ज्यामुळे हल्ली बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत. देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारे आईबाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांमधील त्यांच्याविषयीची प्रेम आणि आपुलकी कुठेतरी उणावू लागली आहे. त्यामुळे हल्लीची मुले पालकांना किंवा मोठ्यांना उलट उत्तरे देताना जराही विचार करत नाहीत. सातत्याने हिंस्र व्हिडीओ गेम्स, रिल्स पाहून लहान मुलांमध्येही विविध शारीरिक आणि मानसिक दोष वाढू लागले आहेत. मोबाईल, टीव्ही पहात जेवल्याने मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागले आहेत. घरातील सात्विक आणि पौष्टिक आहारापेक्षा बाहेरील पिझ्झा-बर्गर खाण्यामध्ये मुलांची रुची वाढू लागली आहे. सध्याच्या स्पर्धात्मक जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक त्यांना शाळेसोबत कोचिंग क्लासेस, प्रायव्हेट ट्युशन्सना घालत आहेत. हे कमी म्हणून कि काय त्याच्या जोडीला जिम्नॅस्टिक, स्पोर्ट्स, सिंगिंग, डान्स क्लासेसनाही मुलांना जावे लागत आहे. या सर्वांच्या ओझ्याखाली बालवयातच मुले राब-राब राबत आहेत. पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलताना मुलांचे बालपण मात्र हरवत चालले आहे. गेल्या काही वर्षांत लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे . या सर्वांचा परिणाम म्हणून बाल गुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक चढू लागला आहे. १०-१२ वर्षांची लहान मुले सुद्धा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी उलट बोलले, अपमान केला किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी आज कितीतरी किराणा मालाच्या दुकानांत, चहाच्या टपरीवर, उपहारगृहांमध्ये, छोट्या कारखान्यांमध्ये लहान मुले राबताना दिसतात. सिग्नलवर, रेल्वे आणि बसेसमध्ये लहान मुलांकडून भीक मागून घेणे हाही एक व्यवसाय झाला आहे. मुलांचे हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे ? पालकांचे, समाजाचे कि सरकारचे ?



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# आनंदी राहण्याचा निर्णय घ्या : सुधांशु महाराज

आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही.

विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## मच्छीमार सेलच्या वतीने वृक्षारोपण

**घाटंजी:** येथील भाजप मच्छीमार सेलच्या वतीने मंगळवारी विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयात फळांचे वाटप करण्यात आले. तसेच परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरणाची काळजी घेण्याचा संदेश देण्यात आला. पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस ढासळत चालला आहे. त्याचा विपरित परिणाम वातावरणावर होत आहे. त्यामुळे वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे. प्रत्येकाने वृक्षारोपणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी भाजप मच्छीमार सेलचे तालुकाध्यक्ष नीरज मत्रे, सेल जिल्हाध्यक्ष प्रदीप भनारकर, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. निखिल पुंडे, प्रवीण पारशिवे, प्रकाश मोहिजे, अश्विन सातघरे, नितेश बावणे, निखिल राऊत, संकेत सातघरे आदी उपस्थित होते.

# शेतकरी महिलांसाठी किसान संस्थेची भाऊबीज

**यवतमाळ , दि.१४, महासागर प्रतिनिधी:** माणुसकीचा दिवा प्रज्वलित करणारा, समाजातील अंधार दूर करणारा आणि बंधुत्वाचा संदेश देणारा उपक्रम म्हणून किसान बहुउद्देशीय संस्था, बिरसापेठतर्फे 'तिमिरातून तेजाकडे' या नावाने भाऊबीज स्नेहमिलन सोहळा झाला. आत्महत्याग्रस्त शेतकरी भगिनी तसेच कुमारी माता (दामिनी भगिनी) यांच्या सन्मानार्थ आयोजित हा कार्यक्रम संपूर्ण विदर्भासाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी आमदार संजीव रेड्डी बोदकुरवार होते. कार्यक्रमाची सुरुवात आत्महत्याग्रस्त शेतकरी महिलांसाठी किसान संस्थेचा भाऊबीज सोहळा झाला.

दीपप्रज्वलन व भारतमातेच्या पूजनाने झाली. संस्थेचे अध्यक्ष पुनाजित कुळमेथे यांनी संस्थेच्या सामाजिक कार्यांचा आढावा घेत

भावनिक प्रास्ताविक सादर केले. संस्थेच्या सचिव वंदना कुळमेथे व ग्रामपंचायत शिबला सरपंच रजनी तोंडासे या मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.



कार्यक्रमात आत्महत्याग्रस्त शेतकरी महिला मंगला वाघारे यांनी संघर्षमय प्रवासाविषयी बोलताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू आणले. भगिनींनी आपल्या भावना ओवाळणी करून भाऊबीज साजरी केली, ज्यातून स्नेह, आदर आणि समाजातील बंधुभावाचे दर्शन घडले. यावेळी माजी आमदार संजीव रेड्डी बोदकुरवार म्हणाले या महिलांनी सन्मानाने जगण्यासाठी हात देणे, हीच खरी दिवाळी आहे. किसान संस्था या भगिनींसाठी खऱ्या अर्थाने भावाची भूमिका निभावत आहे. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. अनिल कोरपेनवार यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी भगिनी व दामिनी मातांसाठी प्रशिक्षण व स्वावलंबन उपक्रमाकरिता ५० हजाराची देणगी जाहीर केली. कार्यक्रमाचे संचालन विद्यानंद अहिरे, आभार सचिन आत्राम यांनी केले. समारोप विशाखा धाडसे यांच्या पसायदानाने झाला.

या प्रसंगी शेतकरी भगिनी, दामिनी माता, युवक-युवती आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. किसान बहुउद्देशीय संस्था आदिवासी व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी परसबाग, शिवणकाम प्रशिक्षण, वनोपज मध्ध संकलन, बालसंस्कार केंद्र, रोजगार निर्मिती अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे कार्यरत आहे.

## रब्बी पीक पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करा

■ कृषी विभागाचे शेतक-यांना आवाहन

**यवतमाळ, दि.१४, महासागर प्रतिनिधी:** रब्बी हंगामातील पिकांच्या यशाचे पहिले पाऊल म्हणजे दर्जेदार आणि प्रक्रिया केलेले बियाणे होय. शुद्ध आणि निरोगी बीज हेच समृद्ध उत्पादनाचे मूळ आहे. हवामानातील बदल, जमिनीत असलेले रोगकारक जीवाणू, बुरशी, विषाणू तसेच किडींचा प्रादुर्भाव या काळात वाढतो. अशा परिस्थितीत बीजप्रक्रिया करणे अत्यावश्यक ठरते, असे आवाहन कृषी विभागाने शेतकरी बांधवांना केले आहे.

योग्य पद्धतीने केलेल्या बीजप्रक्रियेमुळे बियाण्याचे अंकुरण चांगले होते, रोगप्रतिबंधक क्षमता वाढते आणि पिकाची सुरुवातीची वाढ सक्षम होते. बीजप्रक्रियेचे अनेक फायदे आहेत. यामुळे बियाण्यापासून आणि मातीतून प्रसारित होणाऱ्या बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण मिळते. पिक उगवणीनंतरच्या पहिल्या ३० ते ३५ दिवसांत रसशोषक किडींपासूनही पिकाचे रक्षण होते. परिणामी, किड आणि रोग व्यवस्थापनावरील खर्चात बचत होते तसेच उत्पादनात लक्षणीय वाढ होते. जैविक खतांच्या बीजप्रक्रियेमुळे झाडांना आवश्यक अन्नद्रव्ये सहज उपलब्ध होतात आणि पिकाची वाढ जोमदार होते.बीजप्रक्रिया करताना काही खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रक्रिया करताना हातमोजे, मास्क आणि चष्म्याचा वापर करावा. बियाणे प्लास्टिक शीट, बारदाणा किंवा यंत्राद्वारे प्रक्रिया करावे. प्रक्रिया केलेले बियाणे कोरड्या आणि सावलीच्या ठिकाणी वाळवावे. रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया योग्य क्रमाने करणे गरजेचे आहे प्रथम रासायनिक बुरशीनाशक, त्यानंतर रासायनिक किटकनाशक, आणि ३ ते ४ तासांनी जैविक बुरशीनाशक व जीवाणू संवर्धक जसे रायझोबियम, अझोटोबॅक्टर, केएमबी किंवा पीएसबी यांची प्रक्रिया करावी. बीजप्रक्रिया केलेले बियाणे ३ ते ४ तासांच्या आत पेरणीसाठी वापरणे अधिक परिणामकारक ठरते, अशी सूचना कृषी विभागाने केली आहे.

## राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती

**यवतमाळ , दि.१४, महासागर प्रतिनिधी:** ११ नोव्हेंबर रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ तर्फे राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, यवतमाळ येथे करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार व नागेश वि. वकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दिपक एच. दाभाडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यवतमाळ यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून चारूदत्त देवतळे, पर्यवेक्षक श्रीमती



पांडव, ज्येष्ठ शिक्षिका उपस्थित होते, तर प्रमुख वक्ते म्हणून सोनाली भोयर, पॅनल वकील यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात सोनाली भोयर यांनी 'शिक्षणाचा अधिकार', मूलभूत हक्क, संवैधानिक सक्षमीकरण, तसेच पोक्सो कायदा २०१२ आणि अंमली पदार्थांच्या गैरवापराबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्येक बालकाला ६ ते १४ वयोगटापर्यंत मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा हक्क आहे, तसेच खाजगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच बालकांवर होणारा शारीरिक व मानसिक छळ रोखण्याचे कायदेशीर उपाय, चांगला व वाईट स्पर्श यातील फरक, आणि सोशल मीडियावरून होणाऱ्या फसवणुकीबाबत विद्यार्थ्यांना सावध केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात दिपक एच. दाभाडे यांनी राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या योगदानाचा उल्लेख केला. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, बौद्धिक विकास, तसेच अंमली पदार्थांच्या सेवनावरील कायदे (एन डी पी एस Act, १९८५) आणि त्यांचे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संगीता बोंडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीमती मंदा बांदरे यांनी केले. या प्रसंगी विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त महारॅली

**यवतमाळ, दि.१४, महासागर प्रतिनिधी:** उमरसरा येथील आदिवासी समाज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने क्रांतिसूर्य महानायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती १५ नोव्हेंबर रोजी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त दुपारी महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक पालकमंत्री संजय राठोड, माजी मंत्री प्रा. वसंतराव पुरके, प्रमुख अतिथी पराग पिंगळे, बिरसा पर्व अध्यक्ष राजू चांदेकर, प्रा. डॉ. रामराव उईके, ऑल इंडिया एम्पलॉईज फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश किन्हाके, रमेश अग्रवाल, माजी नगरसेविका दर्शना इंगोले, माजी सभापती दिनेश चिंडाले, मुकेश देशभ्रतार, धनंजय पुरके, किशोर उके, चेतन शिरसाट, किशोर भगत, स्थुल, बिरसा मुंडा समितीचे संजू मडावी, बाबाराव उईके यांची उपस्थिती राहणार आहे.

१५ नोव्हेंबरला दुपारी २ वाजता उमरसरा ग्रामपंचायत येथून संस्थेचे अध्यक्ष दिलीप उईके, उपाध्यक्ष आशिष मडावी, सचिव लक्ष्मन ईवनाते यांच्या मार्गदर्शनात महारॅली काढण्यात येणार आहे. उमरसरा ग्रामपंचायत कार्यालयापासून महारॅलीस प्रारंभहोणार असून जगत मंदिर रोड, माइंदे चौक ते आर्णी रोड बिरसा मुंडा पुतळ्याला हारार्पण करून रॅली परत बिरसा मुंडा सांस्कृतीक भवन ग्रामपंचायत उमरसरा येथे विसर्जित होणार आहे. सायंकाळी ६ वाजता आदिवासी पारंपरिक दंडार नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता आदिवासी पारंपरिक दंडार नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

रात्री ८ वाजतापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा समाजबांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन आदिवासी समाज बहुउद्देशिय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## अवैध रेती वाहतूक प्रकरणी कारवाई

**घाटंजी :** तालुक्यातून वाहणाऱ्या पैनगंगा अडाण वाघाडी नदीपात्रातून दिवस-रात्र रेतीची तस्करी सुरू आहे. घाटंजी तालुक्यातील कुर्ली महसूल मंडळातील ताडसावळी सायफळ घाटावरून मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा सुरू आहे.

दरम्यान, गुरुवार, १३ नोव्हेंबर रोजी पहाटे ताडसावळी घाटावरून विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर अवैध रेतीची वाहतूक करीत असताना महसूल पथकाला आढळला. एकसदर ट्रॅक्टर ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी तहसील कार्यालयात लावण्यात आला आहे. ही कारवाई तहसीलदार विजय साळवे यांच्या नेतृत्वात मंडळ अधिकारी पी. आर. कांबळे, ग्राम महसूल अधिकारी आर. पी. कुमरे, ए. एस. कुळसंगे, एम. डी. किनाके, कोतवाल गजानन गेडाम आदींनी केली. घाटंजी तालुक्यातून अडाण नदी गेली आहे.

## स्पोर्ट मीट क्रीडा महोत्सवासाठी विद्यापीठाचे संघ घोषित

**यवतमाळ:** नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे ४ ते ८ डिसेंबरदरम्यान २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ स्पोर्ट मीट क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ॲथलेटिक्स (पुरुष व महिला), बास्केटबॉल (पुरुष व महिला), कबड्डी (पुरुष व महिला), व्हॉलिबॉल (पुरुष व महिला), बुद्धिबळ (पुरुष व महिला), टेबल टेनिस (पुरुष व महिला), बॅडमिंटन (पुरुष व महिला) संघ घोषित करण्यात आला आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कौतुक केले. चमूंचा प्रशिक्षण वर्ग २२ नोव्हेंबर ते १ डिसेंबरदरम्यान होणार आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

## वरोडीत चातुर्मास समाप्तीनिमित्त स्वच्छता अभियान

**फुलसावंगी :** धर्म आणि समाजकार्याची सांगड घालत वरोडी येथे चातुर्मास समाप्तीनिमित्त हभप साईनाथ महाराज वसमतकर यांच्या मार्गदर्शनात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र सरकारचे स्वच्छता दूत यावेळी आमदार किसनराव वानखेडे यांची उपस्थिती होती. 'अस्वच्छतेमुळे मानवाच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम' याबद्दल नागरिकांना सविस्तर माहिती दिली. तसेच, त्यांनी विद्यार्थी दशेत शिक्षणाला असलेले अनन्यसाधारण महत्त्व पटवून देत, विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सीताराम पाटील ठाकरे, योगेश वाजपेयी, नथ्थू भांगे, निळकंठ राऊत, सरपंच गायत्री शिंदे, ग्रामसेवक बहाद्दुरे, संतोष अडकिणे, रामहरी अडकिणे, माणिकराव वानखेडे, श्रीराम पाटील, शिवाजी पाटील, पिंटू पाटील, परमेश्वर जाधव, अनंता पाटील, उत्तमराव पंडागळे, प्रतिश पाटील अडकिणे आदी उपस्थित होते.

## राष्ट्रीय विधी सेवा दिनानिमित्त कायदेशीर सेवा सप्ताहाचे आयोजन




**यवतमाळ, दि.१४, महासागर प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार नागेश वि. न्हावकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, यवतमाळ तर्फे "राष्ट्रीय विधी सेवा दिन" साजरा करण्यात आला. कार्यक्रमास दिपक एच. दाभाडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यवतमाळ उपस्थित होते.या प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत ९ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत "कायदेशीर सेवा सप्ताह" राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या सप्ताहात पॅरा विधी स्वयंसेवकांकडून यवतमाळ शहर तसेच ग्रामीण भागात डोअर-टू-डोअर भेटीद्वारे नागरिकांना कायदेविषयक जनजागृती करण्यात येणार असून, मोफत विधी सहाय्य योजना व इतर प्राधिकरणाच्या उपक्रमांची माहिती दिली जाणार आहे. कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी, पॅरा विधी स्वयंसेवक आणि न्यायालयीन अधिकारी उपस्थित होते.

## दुःख दूर करण्यासाठी अज्ञान नष्ट करण्याची गरजः सद्गुरू श्री अनंत महाराज

**मारेगाव, दि.१४, महासागर प्रतिनिधी:** मानवी जीवनातील दुःख, संभ्रम आणि अस्थिरता दूर करण्यासाठी सार–असाराचे ज्ञान करून सार ग्रहण करीत ज्ञानमार्गाकडे वाटचाल करावी, असा जीवनमार्गदर्शक संदेश सद्गुरू श्री अनंत महाराजांनी आपल्या कीर्तनातून दिला. त्यांच्या ओजस्वी वाणीने संपूर्ण वातावरण भक्तिभावाने भारून गेले.सकल संत निर्णय मठ, कुंभा यांच्या वतीने दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित पुण्यतिथी महोत्सवात परिसरातील असंख्य भाविक भक्त उपस्थित राहून सद्गुरूंच्या विचारांचे श्रवण केले. भजन, नामस्मरण आणि कीर्तनाने सजलेल्या या कार्यक्रमात अध्यात्म, श्रद्धा आणि भक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य भाऊसाहेब पिंपळकर यांनी "जाणावे ग्राम हेचि मंदिर, ग्रामातील जन सर्वेश्वर, सेवा हेचि पूजा समग्र हाची विचार निवेदावा" या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारावर मार्गदर्शन केले.

त्यानंतर भास्करभाऊ पारखी, सुरेशभाऊ पोटे, सुरेशभाऊ बोपटे यांच्या प्रवचनाचे सत्र झाले. तसेच श्री विष्णूभाऊ बावणे, श्री रमाकांतभाऊ मांढरे, श्री विठ्ठलराव बावणे आणि सद्गुरू श्री अनंत महाराज यांच्या कीर्तन कार्यक्रमांनी संपूर्ण वातावरण अध्यात्ममय झाले.

सद्गुरू श्री अनंत महाराजांनी "मननं करो गुरु ज्ञान हितेशी" या सद्गुरू कबीर महाराजांच्या पदाचे विवेचन करताना सांगितले की, "मनुष्याने ज्ञान आणि अज्ञान समजून घ्यावे. जगत ज्ञान आणि गुरु ज्ञान या दोन प्रकारांत ज्ञानाचे विभाजन होते. स्वतःला जाणणे म्हणजे ज्ञान आणि दुसऱ्याला जाणणे म्हणजे अज्ञान. म्हणून स्वतःला जाणावे — जाणावे आपणाशी आपण, हेच नाव ज्ञान."महाराजांनी पुढे सांगितले की, "जोपर्यंत शरीरात जीव आहे, तोपर्यंत ज्ञानानेच व्यवहार करा. सत्य, शील, विचार, दया आणि धीरज ही तत्त्वे जीवनात अंगीकारा. वर्तमानकाळातील कर्म हेच भविष्य घडवते; म्हणून आजचे कर्म शुद्ध करा, कारण ज्ञान हे दुःख मिटवण्याचे सर्वोच्च साधन आहे. ज्ञानामुळेच दुःखाचे हरण होते."या प्रेरणादायी कीर्तनातून सद्गुरूंनी जीवनातील अध्यात्म, आचरण आणि साधनेचा गाभा उलगडून दाखवला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री ओमप्रकाश पिंपळकर व कुंभा येथील गुरु भक्तांनी परिश्रम घेत सहकार्य केले. हा ज्ञान, भक्ती आणि सेवाभावाचा संगम असलेला पुण्यतिथी महोत्सव भाविकांच्या मनात नवी ऊर्जा आणि अध्यात्मिक प्रेरणा निर्माण करून गेला.

## » संक्षिप्त...

### पक्षी निरीक्षण सप्ताहाचा समारोप



**पांढरकवडा :** पक्षी निरीक्षण सप्ताहाच्या समारोप निमित्त टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य (पांढरकवडा) येथे 'एक दिवस फॉरेस्ट ऑफिसर सोबत' हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमासाठी निबंध स्पर्धांमधून विविध शाळांमधील १८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांना पक्षी निरीक्षण, पक्ष्यांच्या सवयी व अधिवास, तसेच पर्यावरणीय संतुलन याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांना वनविभागातील अधिकारी आणि कर्मचारी कशाप्रकारे कार्य करतात, वन संवर्धनात त्यांची भूमिका काय असते, तसेच निसर्ग संवर्धनासाठी विभागाचे प्रयत्न याबद्दलही प्रत्यक्ष अनुभवातून मार्गदर्शन करण्यात आले. या विद्यार्थ्यांना टिपेश्वर अभयारण्याची सफारी करून देण्यात आली, ज्यातून त्यांनी जंगलातील परिसंस्था, पक्षी व वन्यजीव यांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. या उपक्रमाला विभागीय वन अधिकारी उत्तम फड, सहायक वनसंरक्षक उदय आव्हाड, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत सोनुले, पारवा वनपरिक्षेत्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### खडसे विद्यालयात जनजाती गौरव पंधरवडा



**आर्णी:** तळणी येथील श्री जानरावजी खडसे विद्यालयात जनजाती गौरव पंधरवडा अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत ११ नोव्हेंबर रोजी शाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषेत येऊन आदिवासी नृत्य सादर केले. सदर कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### हॉकीच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त मल्लखांबचे प्रात्यक्षिक सादर



**यवतमाळ:** हॉकी असोसिएशन ऑफ डिस्ट्रिक्ट यवतमाळ यांच्या वतीने राष्ट्रीय खेळ हॉकीच्या शतकपूर्तीनिमित्ताने दाते बी. पी. कॉलेज क्रीडांगणावर प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये सात नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमामधे जिल्हा क्रीडा संकुल मल्लखांब ॲकॅडमी व अँग्लो हिंदी हायस्कूल यवतमाळच्या मुलीनी व मुलांनी पुरविलेल्या मलखांबचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. विद्यापीठ खेळाडू संस्कार धरणे, उन्नती अतकरे, राज्य खेळाडू मनस्व गाडवे, समीक्षा राठोड, मुक्ता मेश्राम, नक्षत्रा तुपकर, श्रेया चुटे, परणिती दाभाडे, रश्मी कुमरे, टीनू मादेशवार, अनमोल राठोड, मंथन फुलाटे, अंश कुमरे यांनी मल्लखांबचे उत्तम सादरीकरण केले. राज्य खेळाडू मनस्व गाढवे, समीक्षा राठोड, विद्यापीठ खेळाडू संस्कार धरणे, उन्नती अत्तकरे प्रशिक्षक व विद्यापीठ खेळाडू वंशीक वडे, संजय सातारकर, महाराष्ट्र शासनाचा जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त, समता राष्ट्रीय क्रीडा रत्नपुरस्कार प्राप्त यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### रस्त्यावर मिळालेला मोबाइल शिक्षकाने केला परत



**दिग्रस :** सध्या फसवणुकीच्या अनेक घटना घडत असतानाही सत्याची कास धरून संस्कारी कुटुंबातील व्यक्तिमत्त्वाची जाण ठेवत प्रामाणिकपणाची जपवणूक करणारे आहे. त्या संस्कारात मोठे होऊन क्रीडा शिक्षकाने रस्त्यार सापडलेला मोबाइल पोलिसांना परत केला. उमेश भटकर असे त्या क्रीडा शिक्षकाचे नाव आहे. त्यांना शहरातीलच शिर्डी मंगल कार्यालयाजवळ मोबाइल मिळाला. त्यांनी दिग्रस पोलीस ठाण्याचे ठाणेदार वैजनाथ मुंडे यांच्याकडे जमा करून ज्यांची तक्रार असेल किंवा ज्या कोण्या व्यक्तीचा मोबाइल असेल त्यांची खात्री करून त्यांना परत द्यावा म्हणत प्रामाणिकपणाचा परिचय दिला. तो मोबाइल शहरातीलच तुषार मोरे या युवकाचा असल्याची माहिती ठाणेदार वैजनाथ मुंडे यांना मिळाली. त्यांनी युवकाला तत्काळ बोलवत मोबाईल दिला. तसेच क्रीडा शिक्षकांचे कौतुक केले.

### जुन्या वादातून काठीने हल्ला

**पुसद :** तालुक्यातील हुडी तांडा येथे जुन्या वादातून काठीने हल्ला करून दोघांनी एकाला बेदम मारहाण केली. यात लखन कन्नडा चव्हाण हा गंभीर जखमी झाला. याप्रकरणी लखनच्या तक्रारीवरून १२ नोव्हेंबर रोजी पुसद ग्रामीण पोलिसांनी कनीराम चतरू चव्हाण, रामेश्वर कनीराम चव्हाण या दोघांवर कलम ११८ (१), ३५२, ३ (५) भारतीय न्याय संहितेनुसार (बीएनएस) मारहाणीचा गुन्हा दाखल केला.



# बालांगण

## तलावांचं शहर उदयपूर

सफर शहरांची

**दो**स्तांनो, राजस्थानमध्ये उदयपूर नावाचं सुंदर शहर आहे. उदयपूर ही एके काळी मेवाड साम्राज्याची राजधानी होती. महाराणा उदयसिंहने हे शहर वसवलं. त्यामुळे या शहराला उदयपूर हे नाव पडलं. उदयपूर हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. उदयपूरमध्ये बरेच तलाव आहेत. हे शहर अरवली पर्वतरांगांनी वेढलेलं आहे. उदयपूरमध्ये बऱ्याच ऐतिहासिक वास्तू आहेत. पिचोला तलाव, उदयपूर सिटी पॅलेस, कुंभलगड किल्ला ही उदयपूरमधली प्रसिद्ध पर्यटनस्थळं आहेत.

उदयपूरला तलावांचं शहर असंही म्हणतात. या तलावांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या शहरातले तलाव एकमेकांशी जोडलेले आहेत. त्यामुळे इथल्या पाण्याची पातळी कधीच कमी होत नाही. याच कारणामुळे उदयपूरचं वातावरणही थंड असतं. फतेहसागर, जयसमंद, बढी, दूधतलाई हे तलावही खूप प्रसिद्ध आहेत. इथल्या तलावांमध्ये नौकाविहाराचा आनंद लुटता येतो.

इथल्या पिछोला नावाच्या तलावात लेक पॅलेस नावाचं हॉटेल आहे. हे हॉटेल खूप सुंदर आहे. इथल्या कुंभलगड किल्ल्याची निर्मिती राणा कुंभाने केली होती. कुंभलगडाची भिंत खूप लांब आहे. चीनची भिंत जगातली सर्वाधिक लांबीची भिंत आहे. या भिंतीची गणना जगातल्या सात आश्चर्यांमध्ये केली जाते. त्यानंतर कुंभलगडच्या भिंतीचा क्रमांक लागतो, असं म्हणतात. ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आहे. जयसमंद हा कृत्रिम तलाव आशिया खंडातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कृत्रिम तलाव आहे. उदयपूर हे खूप शांत शहर आहे. त्यामुळे या शहराला एकदा तरी भेट द्यायला हवी.







## अनोखे वाद्य सरोद

ओळख वाद्यांची

**स**रोद हे भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अत्यंत महत्त्वाचे तंतुवाद्य आहे. याचा स्वर गंभीर आणि ध्यानसाधनेसारखा असतो. सरोदचा उगम अफगाणिस्तानातील रुबाब या वाद्यापासून झाल्याचे मानले जाते. अठराव्या शतकात अफगाणी रुबाब भारतात आला. त्यात काही बदल करून सरोदाची निर्मिती झाली. सरोद लाकडापासून बनवली जाते. त्याची ध्वनीपेटी धातूपासून बनवली जातेकिंवा प्राण्यांच्या कातड्याने झाकलेली असते.सरोदला साधारण १७ ते २५ तारा असतात. त्यापैकी काही मुख्य तारांवर राग वाजवला जातो. इतर तारा झंकारासाठी आणि तालासाठी वापरल्या जातात. सरोदला पट्ट्या नसतात. त्यामुळे बोटांच्या नखांनी तारा वाजवल्या जातात. त्यातून मींड किंवा गोड सरकते सूर तयार होतात. सरोदच्या तारा जवा नावाच्या पिकने वाजवल्या जातात. डावा हात तारांवर सरकवून स्वर नियंत्रित केले जातात. सरोदचा वापर प्रामुख्याने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील राग सादर करण्यासाठी केला जातो. त्यात आलाप, जोड, झाल व गट अशा टप्प्यांतून रचना सादर केली जाते. सरोद एकल वादनासाठी तसेच जुगलबंदीसाठीही वापरले जाते. सरोद म्हटले की पहिले नाव येते ते उस्ताद अमजद अली खान यांचे. त्यांच्याशिवाय उस्ताद अली अकबर खान, उस्ताद हाफिज अली खान यांच्या घराण्यानेही सरोद परंपरेला मोठे योगदान दिले आहे. सरोद भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अनमोल रत्न मानले जाते.





## पर्याय व्होकेशनल अभ्यासक्रमांचा

कोण होणार?

**दो**स्तांनो, आता करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत डॉक्टर, इंजिनिअर, एमबीए, सीए, सरकारी नोकरी, बँकिंग या क्षेत्रांकडेच विद्यार्थ्यांचा कल असायचा पण आता व्होकेशनल म्हणजे व्यावसायिक अभ्यासक्रमांचं आकर्षण वाढताना दिसत आहे. पारंपरिक अभ्यासक्रमांऐवजी वेगळ्या वाटा निवडण्याकडे अनेकांचा कल असतो. बारावी किंवा पदवीनंतर अशा अभ्यासक्रमांची निवड करून चांगलं करीअर करता येतं. अशा काही पर्यायांविषयी...



- परदेशी भाषा शिकून तुम्ही विविध क्षेत्रांमध्ये मुशाफिरी करू शकता. नोकरीतही परदेशी भाषेचा लाभ होऊ शकतो. पर्यटनाच्या क्षेत्रात चांगला वाव मिळू शकतो. तसंच तुम्ही दुभाषक म्हणूनही काम करू शकता. लेखन क्षेत्रात करीअर करू शकता.
- हॉटेल मॅनेजमेंटचा चांगला पर्याय तुमच्यापुढे आहे. खवय्ये असाल किंवा स्वयंपाक येत असेल तर या क्षेत्रात जाता येईल.
- ट्रॅव्हल आणि टूरिझमचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पर्यटनाची हौस भागवू शकता. यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात नोकरी करता येईल. पुरेशा अनुभवानंतर स्वत:चा व्यवसाय सुरू करता येईल.
- सध्या वेगवेगळ्या प्रकारची पादत्राणं तयार केली जातात. प्लास्टिक, रबर, ताग तसंच इतर साहित्य वापरून पादत्राणांची निर्मिती केली जाते. फुटवेअर डिझायनिंग हा करीअरचा उत्तम पर्याय ठरू शकतो.
- कलाक्षेत्रात रस आणि कल्पकता असल्यास टेक्सटाईल डिझायनिंग, टूल अँड डाय मेकिंग, टेक्सटाईल डिझाइन, फॅशन डिझाईन, इंटिरिअर डिझाईन अशा पर्यायांकडे वळता येईल.

## दक्षिणगंगा कावेरी

जीवनदायिनी नदी

**का**वेरी दक्षिण भारतातील अत्यंत महत्त्वाची नदी आहे. तिचा उगम कर्नाटक राज्यातील कोडगू जिल्ह्यातील ब्रह्मगिरी टेकड्यांमधून होतो. कावेरी नदीची लांबी साधारण ८०५ किलोमीटर आहे. ती कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यांतून वाहते. शेवटी बंगालच्या उपसागराला मिळते. धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या खूप महत्त्वाची असल्यामुळे कावेरी नदीला ‘दक्षिणगंगा’ म्हटले जाते. कावेरी नदीचा प्रवास खूप सुंदर आहे. ती डोंगर, दऱ्या, जंगल आणि मैदानांतून वाहत जाते. या प्रवासात हरंगी, हेमावती, शिम्शा, भवानी आणि अमरावती यासारख्या अनेक उपनद्या तिला मिळतात. पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी कावेरी नदीवर अनेक धरणे आणि कालवे बांधले गेले आहेत.



कृष्णराज सागर धरण, मेट्टूर धरण ही महत्वाची धरणे आहेत. या धरणांमुळे केवळ शेतीसाठीच नव्हे तर पिण्यासाठी आणि वीज निर्मितीसाठीही पाणी उपलब्ध होते. धार्मिकदृष्ट्या कावेरी नदीला फार मोठे स्थान आहे. कावेरीला देवी मानले जाते. कावेरीच्या तीरावर अनेक धार्मिक उत्सव आणि मेळावे भरवले जातात. तिरुचिरापल्ली, श्रीरंगम, तलाकावेरी, मयिलाडुथुराई यांसारखी शहरे कावेरीच्या काठी आहेत. कावेरीला पवित्र मानून तिच्या काठावर स्नान व पूजा केली जाते. कर्नाटक आणि तमिळनाडू या दोन्ही राज्यांसाठी कावेरी ही जीवनरेखा आहे. परंतु आज कावेरी नदीसमोर प्रदूषण, जास्त पाणी उपसा आणि हवामानातील बदल ही आव्हाने आहेत. शहरांमधील सांडपाणी, कारखान्यांचा कचरा आणि प्लास्टिक यामुळे नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे कावेरी नदीचे रक्षण करणे आणि तिचे पाणी शुद्ध ठेवणे आवश्यक आहे.

## हॅलोविनची गोष्ट

आयरिश लोककथा

**आ**यर्लंडमधल्या क्लोव्हरविल नावाच्या एका छोट्याशा गावातली गोष्ट. हॅलोविनचा दिवस होता. सगळीकडे भोपळ्याचे दिवे लावले होते. कोळ्याच्या जाळ्यांची आणि चेटकिणीच्या मुखवट्यांची सजावट केली होती. मुले रंगीबेरंगी भुतांचे कपडे घालून घरोघरी जात होती. त्या गावात एक घर होते. तिथे मिसेस मॉर्गन राहायच्या. सगळ्या मुलांना त्यांची भीती वाटायची. कुणी तिकडे गेले की दरवाजा आपोआप बंद व्हायचा. आतून हसण्याचा आवाज यायचा. हू हू हू!



मुले पळतच पुढच्या घरात जायची. मिसेस मॉर्गनच्या घरापाशी कुणीच थांबायचे नाही. लिअमला त्या घराबद्दल खूप कुतूहल वाटायचे. त्या दिवशी लिअम मुळीच ऐकेना. मी तिला भेटणारच! ती जर भूत असेल, तर मी तिला माझ्या गोळ्या देऊन टाकेन! सगळे मित्र हसले. पण लिअम टॉर्च घेऊन त्या घरात गेला. आत गुडुप अंधार होता. कोळ्याची जाळी होती. टेबलावर खूप जुने कपकेक्स ठेवले होते. अगदी दगडासारखे कडक!

अचानक त्याला मागून कोणी तरी म्हणालं, अरे माझे कपकेक्स



चोरतोस काय?

लिअम घाबरून वळला, तर एक आजीबाई मोठ्ठी टोपी घालून, चमकदार मोजे आणि हॅलोविनचा एप्रन घालून उभी होती! मी भूत नाही. पण दरवर्षी हॅलोविनला मी शूर मुलाची वाट बघते. मला वाटते, की कुणीतरी शूर मुलगा येईल आणि मी त्याला भरपूर खाऊ देईन !

लिअमला आनंद झाला. त्याने त्याच्या सगळ्या मित्रांना बोलावलं. आजीबाईंनी मुलांच्या डोक्यावर चॉकलेट्स आणि गोळ्यांचा पाऊसच पाडला. त्या दिवसापासून क्लोव्हरविलमध्ये मिसेस मॉर्गनच्या घराला कुणी घाबरत नाही. मिसेस मॉर्गन आणि मुले मिळून गाणी गातात. भोपळे सजवतात आणि मजा करतात.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) व्हॉलीबॉलचा जन्म कोणत्या देशात झाला?
२) झुंबा काय आहे?
३) दिवसा चंद्रावरचं तापमान कमी असतं का जास्त?
४) पहिल्या महायुद्धाची सुरूवात कधी झाली?
५) आईस हॉकीच्या संघात किती खेळाडू असतात?
६) हवेची गती मोजण्यासाठी कशाचा वापर केला जातो?
७) एलपीजी हे कोणत्या दोन वायूंचं मिश्रण असतं?
८) जगातला सर्वात उष्ण खंड कोणता?
९) जगातला सर्वात लोकप्रिय खेळ कोणता?
१०) पाब्लो पिकासो कोण होता?

उत्तर : १) अमेरिका २) नृत्यप्रकार ३) जास्त ४) १९१४ ५) सहा ६) ॲनिमोमीटर ७) प्रोपेन आणि ब्युटेन ८) आफ्रिका ९) फुटबॉल १०) चित्रकार

ठिपके जुळवा



## अशी बनते तुमची आवडती जेली...

फन टाईम



**छो**ट्या दोस्तांनो, जेली हा प्रकार बराच लोकप्रिय आहे. महाराष्ट्रात महाबळेश्वरमध्ये मोठ्या प्रमाणावर जेली तयार होते. ही जेली मस्त लागते. गोल आकाराची, रंगीबेरंगी जेली पाहताच खावीशी वाटते. डेझर्टसोबतही जेली येते. अमेरिकेत जेलीला जेल-ओ असं म्हटलं जातं. तापमानानुसार जेलीचा आकार बदलत जातो. ० ते २० अंश सेल्सियस तापमानात जेली सेट होते. पण हे तापमान थोडंसं वाढलं तरी जेली वितळायला लागते. तापमान कमी झाल्यावर पुन्हा घट्ट होते. जेली सेट करण्यासाठी कोणत्या घटकाचा वापर केला जातो, हे तुम्हाला माहित आहे का? यासाठी जिलेटिनचा वापर केला जातो. जिलेटिन हा जेल बनवणारा घटक आहे. प्राण्यांच्या शरीरातल्या टिश्यूंमध्ये सापडणाऱ्या कोलाजन नामक प्रथिनांचा वापर करून जिलेटिन तयार केलं जातं. प्राण्यांची त्वचा किंवा हाडं पाण्यात उकळल्यानंतर जिलेटिन तयार होतं. प्राण्यांच्या टिश्यूंपासून कोलाजनचे तंतू वेगळे होतात. त्यांची पाण्यासोबत प्रक्रिया घडते आणि जिलेटिन तयार होतं. अगदी एक टक्का कोलाजन पाण्यात वितळवल्यानेही जिलेटिन तयार होऊ शकतं.

जिलेटिनमध्ये प्रथिनांची मोठी साखळी असते. गरम पाण्याशी संपर्क आल्यानंतर त्यांचं रूपांतर सूक्ष्म तंतूंमध्ये होतं. हे तंतू पाण्यातल्या सूक्ष्म कणांना स्वत:कडे आकर्षित करतात. यामुळे पाण्यातल्या सूक्ष्म कणांची संख्या कमी होते. हे मिश्रण थंड झाल्यानंतर पाणीयुक्त सूक्ष्म कण एकमेकांवर आदळतात आणि गुंतून बसतात. उरलेलं पाणी प्रथिनांच्या तंतूंमध्ये एकत्र बांधलं जातं आणि या मिश्रणाचं रूपांतर जेलमध्ये होतं. मार्शमॅलो आणि आईसक्रीममध्येही जिलेटिनचा वापर केला जातो. आजघडीला जिलेटिनऐवजी स्टार्च आणि पेक्टिनचा वापर करूनही पदार्थांना घट्टपणा दिला जातो. स्टार्च आणि पेक्टिन हे साखरेचे प्रकार आहेत. त्यांना गुंतागुंतीची कर्बोदकं असंही म्हटलं जातं.

### दोस्त हे मस्त

## पर्शियन मांजर



मुलांनो, कुत्र्यांप्रमाणे मांजराच्याही वेगवेगळ्या प्रजाती असतात. यापैकी एक म्हणजे पर्शियन प्रजातीचं मांजर. हे मांजर खूप गोंडस असतं. त्याला भरपूर केस असतात. पर्शियन मांजर खूप महाग असतं. मांजराच्या या प्रजातीला बरीच मागणी असते. पर्शियन मांजरांची खूप काळजी घ्यावी लागते. त्यांच्याकडे नीट लक्ष द्यावं लागतं. पर्शियन मांजर १० ते १७ वर्षांपर्यंत जगतं. या मांजराचा थाट राजेशाही असतो! पर्शियन मांजर खूप खेळकर आणि प्रेमळ असतं.

### खादाडी

## पौष्टिक पालक रायता



मुलांनो, थोडे आरोग्यदायी पदार्थ खाणंही गरजेचं आहे. म्हणूनच पालक रायता बनवून बघा. यासाठी दोन कप दही, दोन कप बारीक चिरलेला पालक, पाव चमचा लाल तिखट, अर्धा चमचा जिरेपूड, अर्धा चमचा साखर, अर्धा चमचा मिरपूड असं साहित्य घ्या. मीठ, दोन चमचे तेल, थोडी मोहरी आणि कढीपत्ता असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. त्यात जिरं घाला. यात पालक घालून परतून घ्या. पालक थोडा शिजू द्या. मग गॅस बंद करा. आता एका भांड्यात दही, जिरेपूड, लाल तिखट, मिरपूड आणि मीठ घालून हलवून घ्या. आता छोट्या भांड्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. मग कढीपत्ते घाला. हा तडका दह्यात घाला. मग शिजवलेला पालक घाला. तुमचा पालक रायता तयार आहे.

### स्टडी टिप्स

## मेंदूला द्या आराम



मुलांनो, परीक्षेच्या काळात तुम्हाला टीव्ही बघू दिला जात नाही. जास्त वेळ टीव्ही बघू नका, असंही सांगितलं जातं. टीव्ही बघण्यापेक्षा अभ्यास करणं गरजेचं असलं तरी दिवसभरात थोडा वेळ म्हणजे तासभर टीव्ही बघायला हरकत नाही. आपल्या आवडीचा कार्यक्रम बघितल्यावर मेंदू ताजातवाना होतो आणि तुम्ही अधिक जोमाने अभ्यास करू शकता. त्यामुळे तुम्ही अगदी थोडा वेळ टीव्ही बघू शकता. यामुळे मेंदूला आराम मिळू शकतो.

### योगा टाईम

## करा मर्कटासन



मुलांनो, तुम्हाला वर्गात बराच काळपर्यंत बसावं लागतं. तुम्ही घरी बसून अभ्यास करता. शिवाय स्मार्टफोनमुळे मैदानी खेळांचं प्रमाणही कमी झालं आहे. यामुळे अगदी लहान वयात पाठदुखी, खांदेदुखीसारख्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत. म्हणूनच तुम्ही मर्कटासन करायला हवं. या आसनामुळे शरीर लवचिक होतं. पाठीच्या कण्याला आराम मिळतो आणि पाठदुखीचा त्रास कमी होतो.

